दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक ३२९ । शनिवार १२ सप्टेंबर २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

# मनोज जरांगे यांच्या मुंबई आंदोलनाला ‘ग्रीन सिग्नल’!

## मुंबईत येण्यापासून रोखण्यास उच्च न्यायालयाचा नकार
## ‘आंदोलन हा मूलभूत अधिकार’ | आजच्या बैठकीकडे लक्ष

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

जालना : मराठा आरक्षणाच्या मागणीवरून राज्यातील वातावरण पुन्हा तापले असताना मनोज जरांगे पाटील यांच्या संभाव्य मुंबई आंदोलनाचा मार्ग मोकळा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. जरांगे पाटील यांना मुंबईत येण्यापासून रोखण्याचे आदेश देण्यास मुंबई उच्च न्यायालयाने नकार दिला. गेल्या आंदोलनात परिस्थिती बिघडली होती, या कारणावरून यावेळीही परवानगी नाकारता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. आंदोलन करणे हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार असून, त्यात न्यायालय हस्तक्षेप करू शकत नाही, अशी भूमिका खंडपीठाने मांडली.

मनोज जरांगे पाटील यांचे अंतरवाली सराटी येथे आमरण उपोषण आज १४व्या दिवशीही सुरू आहे. मराठा समाजाच्या मागण्यांवर सरकारकडून तोडगा न निघाल्याने जरांगे यांनी आंदोलन मागे घेण्यास नकार दिला आहे. १२ सप्टेंबरनंतर मुंबईकडे कूच करण्याचा इशारा त्यांनी यापूर्वीच दिला आहे.



दरम्यान, जरांगे यांच्या मुंबईतील आंदोलनाला आळा घालण्याच्या मागणीसाठी निलेश डहाणूकर आणि राजेश दळवी यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. मागील आंदोलनाच्या वेळी दक्षिण मुंबईत निर्माण झालेल्या परिस्थितीचा दाखला याचिकाकर्त्यांनी दिला. मात्र, केवळ मागील अनुभवाच्या आधारावर यावेळी आंदोलनाची परवानगी नाकारता येणार नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

आता जरांगे पाटील यांनीही मराठा समाजाला १२ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता अंतरवाली सराटीत प्रत्यक्ष उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. त्यामुळे या बैठकीत मुंबईकडे जाण्याचा मार्ग, आंदोलनाची दिशा आणि पुढील रणनीती निश्चित होण्याची शक्यता आहे.

न्यायालयाच्या भूमिकेमुळे सरकारसमोरील आव्हान वाढले असून, जरांगे यांच्या पुढील भूमिकेकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

### टीव्हीपुढे बसू नका; अंतरवालीत या!

**मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला १२ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता अंतरवालीत होणाऱ्या बैठकीला प्रत्यक्ष उपस्थित राहण्याचे आवाहन केले. आता अटीतटीचा सामना आहे; घरी बसून टीव्हीवर बैठक पाहण्याचे दिवस नाहीत, असे ते म्हणाले. ज्यांना अंतरवालीत येणे शक्य नाही, त्यांनी मुंबईच्या मार्गावर समाजाच्या आंदोलनाला आशीर्वाद देण्यासाठी रस्त्यावर यावे, असे आवाहनही त्यांनी केले.**

## गोंधवणीत १६ वर्षीय संकेतवर धारदार शस्त्राने वार

**श्रीरामपूर :** शहरातील गोंधवणी परिसरातील घरकुल चर्चजवळ १६ वर्षीय संकेत नामक मुलावर दोघा जणांनी धारदार शस्त्राने प्राणघातक हल्ला केल्याची घटना गुरुवारी रात्री घडली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संकेत हा रात्री दुकानातून आपल्या घरी जात असताना दोन जणांनी त्याला अचानक अडविले. त्यानंतर त्याच्या मानेवर धारदार शस्त्राने वार करून हल्लेखोर पसार झाल्याचे सांगण्यात येत आहे. हल्ल्यात संकेत गंभीर जखमी झाला.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. जखमी संकेतवर साखर कामगार रुग्णालयात प्राथमिक उपचार करण्यात आले. प्रकृती गंभीर असल्याने त्याला पुढील उपचारासाठी लोणी येथील प्रवरा हॉस्पिटलमधील अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आल्याची माहिती आहे.

## भरदिवसा कोयत्याने सपासप वार...
## तानाजी बोराडे यांची हत्या

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** तालुक्यातील ऐतिहासिक खर्डा गावलगत सीताराम गडाच्या पायथ्याशी अज्ञात टोळक्याने एका ४० वर्षीय तरुणाच्या डोळ्यात मिरची पावडर टाकून त्याच्यावर कोयत्याने सपासप वार करून त्याची निर्घृण हत्या केली. भरदिवसा घडलेल्या या थरारक व हत्येच्या घटनेने खर्डा परिसर हादरून गेला आहे. या दुर्दैवी व खळबळजनक घटनेत मृत्यू पावलेल्या तरुणाचे नाव तानाजी भास्कर बोराडे (वय ४०, रा. माळीवाडा, ता. भूम) असे आहे.



याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी (दि. ११ सप्टेंबर) दुपारी १२ वाजेच्या सुमारास यातील मयत तानाजी बोराडे हे सीताराम गडाच्या पायथ्याशी असताना स्कुटीवरून आलेल्या ३ ते ४ जणांच्या टोळक्याने त्यांना गाठले. काही समजण्याच्या आतच हल्लेखोरांनी आधी त्यांच्या डोळ्यात मिरची पावडर फेकली. बोराडे हे असहाय्य होताच त्यांच्यावर कोयत्याने प्राणघातक व धारदार कोयत्याने वार केले. तानाजी बोराडे हे रक्ताच्या थारोळ्यात पडले. त्यानंतर हल्लेखोर घटनास्थळावरून पसार झाले.

घटनेची माहिती मिळताच खर्डा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक् उज्वलसिंह राजपूत हे पथकासह तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी गांभीर जखमी झालेल्या बोराडे यांना रूग्णवाहिकेतून जामखेड येथील ग्रामीण रूग्णालयात उपचारासाठी रवाना केले. मात्र, रूग्णालयात पोहोचण्यापूर्वीच रस्त्यातच त्यांचा मृत्यू झाला असल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी घोषित केले.

घटनेचे गांभीर्य ओळखून सहाय्यक पोलीस निरीक्षक उज्वलसिंह राजपूत यांनी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना घटनेची माहिती दिली असून, पुरावे गोळा करण्यासाठी फॉरेन्सिक (न्यायवैद्यक) टीमला पाचारण केले आहे.

हा खून कोणत्या कारणातून झाला याबाबतचे गूढ अद्याप कायम आहे. पोलीस सर्व सर्व बाजूंनी तपास करत असून, फरार आरोपींचा माग काढण्यासाठी पथके रवाना करण्यात आली आहेत. पुढील तपास एपीआय उज्वलसिंह राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली खर्डा पोलीस करत आहेत.

## महत्त्वाचे..

### लाचखोर हवालदाराला चार वर्षांची सक्तमजुरी

नाशिक : तक्रारदाराकडून लाचेची मागणी केल्याप्रकरणी नाशिक तालुका पोलीस ठाण्यातील पोलीस हवालदार रामचंद्र राजाराम आडके याला न्यायालयाने दोषी ठरवत चार वर्षांची सक्तमजुरी व दंडाची शिक्षा सुनावली.

तक्रारदाराच्या नातेवाइकाविरुद्ध दाखल गुन्ह्यात आरोपीला पोलीस कोठडी न घेता न्यायालयात हजर करण्यासाठी आडके याने प्रथम १५ हजार रुपयांची मागणी केली. तडजोडीनंतर दहा हजार रुपये देण्याचे ठरले. याबाबत तक्रार मिळाल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पडताळणी करून सापळा रचला.

या प्रकरणी आडकेविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. सुनावणीअंती न्यायालयाने कलम ७ अन्वये तीन वर्षे सक्तमजुरी व पाच हजार रुपये दंड, तर कलम १३(२) अन्वये चार वर्षे सक्तमजुरी व पाच हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली.

## डंपरच्या ‘हप्त्या’वरून दोघा भावांवर तलवार–कोयत्याने प्राणघातक हल्ला

### १० ते १५ अनोळखी आरोपींवर गुन्हा; बेलवंडी–चिंभळा परिसरात खळबळ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** शेततळ्याच्या कामावर मुरूम–माती वाहतूक करणाऱ्या डंपरचे कथित ‘हप्ते’ न दिल्याच्या रागातून १० ते १५ जणांच्या टोळक्याने दोघा भावांवर तलवार, कोयता व लोखंडी रॉडने प्राणघातक हल्ला केल्याची घटना गुरुवारी (दि. १०) रात्री पिसोरे गावच्या शिवारातील बेलवंडी–चिंभळा रस्त्यावर घडली. या हल्ल्यात नितीन ज्ञानदेव हिरवे (३५) व अभिजीत नानासाहेब हिरवे (२५, रा. बेलवंडी) गंभीर जखमी झाले.



फिर्यादी निखिल हिरवे यांच्या तक्रारीनुसार, ते नितीन व अभिजीत यांच्यासह थार गाडीतून जात असताना नामदेव रासकर यांच्या घराजवळ स्विफ्ट कार आडवी लावून त्यांना अडविण्यात आले. डंपरचे हप्ते देत नसल्याचे म्हणत आरोपींनी शिवीगाळ करून हल्ला केला. अभिजीतला गाडीतून ओढून त्याच्या डोक्यावर कोयत्याने वार करण्यात आला, तर नितीन यांच्या पायावर कोयत्याने वार केल्याचे तक्रारीत नमूद आहे.

या प्रकरणी सुजित इथापे, सचिन उर्फ चिंग्या भागवत, गणेश गायकवाड व नितीन विजय पवार यांच्यासह १० ते १५ अनोळखी व्यक्तींवर बेलवंडी पोलिसांनी विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी सुजितकुमार क्षीरसागर व सहाय्यक निरीक्षक नंदकुमार सोनवलकर यांनी घटनास्थळी पाहणी केली असून पुढील तपास सुरू आहे.

## चार लाख मतदारांची नावे वगळली

- ‘गायब’ नाहीत, ही शुद्धीकरणाची प्रक्रिया!
- विभागीय आयुक्त डॉ. गेडाम यांचा खुलासा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्ह्यात मतदार यादीच्या विशेष पुनरीक्षण कार्यक्रमामुळे राजकीय वर्तुळात तसेच नागरिकांमध्ये निर्माण झालेल्या चर्चेला आता प्रशासनाने स्पष्टीकरण दिले आहे. जिल्ह्यात पूर्वी सुमारे ३८ लाख मतदार होते. पुनरीक्षणाच्या प्रक्रियेनंतर सध्या ३३ लाख ८३ हजार मतदार यादीत राहिले असून सुमारे ४ लाख २६ हजार मतदारांची नावे विविध कारणांमुळे वगळण्यात आली आहेत. मात्र, ही नावे कोणत्याही व्यक्ती अथवा मतदाराला लक्ष्य करून जाणीवपूर्वक कमी करण्यात आलेली नाहीत. दुबार नोंदी, बंद घरे आणि अन्य कारणांमुळे ही प्रक्रिया करण्यात आली असून, नागरिकांनी याबाबत गैरसमज करून घेऊ नये. मतदार यादीची अंतिम पुनर्रचना पारदर्शक पद्धतीने केली जाईल, अशी ग्वाही नाशिक विभागाचे विभागीय आयुक्त डॉ. प्रवीणकुमार गेडाम यांनी दिली.



जिल्हाधिकारी कार्यालयात गुरुवारी मतदार यादी पुनरीक्षणाच्या कामाचा आढावा घेण्यात आला. या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना विभागीय आयुक्त डॉ. गेडाम यांनी सविस्तर **(पान ४ वर)**

### फॉर्म क्रमांक सहा भरून नाव नोंदवा

मतदार यादीचे पुनरीक्षण ही सातत्याने सुरू असलेली प्रक्रिया आहे. सध्याच्या पुनरीक्षणात ज्यांची नावे यादीत नाहीत, तसेच मतदानासाठी पात्र असलेल्या नव्या मतदारांनी फॉर्म क्रमांक सहा भरून आपले नाव मतदार यादीत समाविष्ट करून घ्यावे. त्याचप्रमाणे यादीत नाव असूनही त्यात काही त्रुटी असल्यास त्याबाबतही आवश्यक अर्ज व हरकत दाखल करता येणार आहे.

....................................

अहिल्यानगर जिल्ह्यात पुनरीक्षणापूर्वी सुमारे ३८ लाख मतदार होते. सध्या ३३ लाख ८३ हजार मतदार यादीत आहेत. सुमारे ४ लाख २६ हजार मतदारांची नावे विविध कारणांमुळे वगळण्याच्या प्रक्रियेत आली आहेत. यामध्ये दुबार नोंदी हा महत्त्वाचा घटक आहे. सुमारे १ लाख ४१ हजार १२ मतदारांबाबत अशा नोंदी आढळून आल्या आहेत. याशिवाय ६२ हजार ७६० दुबार नोंदींची बाब समोर आली असून, सुमारे ५० हजार घरे बंद असल्याचे आढळले आहे. उर्वरित प्रकरणांमध्ये अन्य कारणांमुळे पडताळणीची आवश्यकता निर्माण झाली आहे.

## वांगदरीच्या भूमिपुत्राला छत्तीसगडमध्ये वीरमरण

### जवान दत्तात्रय वांगणे यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**श्रीगोंदा :** छत्तीसगडमधील दंतेवाडा येथे केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलात (सीआयएसएफ) कर्तव्य बजावत असताना वीरमरण आलेले वांगदरीचे भूमिपुत्र हेड कॉन्स्टेबल दत्तात्रय शिवाजी वांगणे (वय ५०) यांना शुक्रवारी वांगदरी ग्रामस्थांनी अश्रू नयनांनी अखेरचा निरोप दिला. ‘दत्तात्रय वांगणे अमर रहे’, ‘वीर जवान तुझे सलाम’च्या घोषणांनी संपूर्ण वांगदरी दुमदुमून गेले.

९ सप्टेंबर रोजी दंतेवाडा येथे दत्तात्रय वांगणे यांना वीरमरण आले. तब्बल ८६६ किलोमीटरचा प्रवास करून त्यांचे पार्थिव शुक्रवारी दुपारी एक वाजता रुग्णवाहिकेतून वांगदरी येथे आणण्यात आले. आपल्या भूमिपुत्राला **(पान ४ वर)**

## १७ वाहनांसाठी ७२ चालक; २३८४ कर्मचाऱ्यांचा फौजफाटा!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**शनिशिंगणापूर देवस्थानच्या कारभाराचे होणार फॉरेन्सिक ऑडिट**

**अहिल्यानगर :** लाखो भाविकांच्या श्रद्धेचे आणि आंतरराष्ट्रीय ख्यातीचे श्रीक्षेत्र शनिशिंगणापूर देवस्थान सध्या आर्थिक अनियमिततेच्या आरोपांमुळे प्रशासनाच्या ताब्यात असतानाच, देवस्थानच्या कारभाराबाबत धक्कादायक आकडे समोर आले आहेत. मागील पाच वर्षांच्या आर्थिक व्यवहारांचे फॉरेन्सिक ऑडिट करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, त्याचा अहवाल थेट राज्य शासनाकडे सादर केला जाणार आहे. विभागीय आयुक्त तथा देवस्थानचे प्रशासक डॉ. प्रवीण गेडाम यांनी ही माहिती दिली. देवस्थानच्या प्रशासकीय कामकाजाच्या पाहणीत मोठ्या प्रमाणात खर्च **(पान ४ वर)**

## शेतकऱ्यांच्या शेतात संशोधनाची नवी पहाट

### महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या २२ वाणांसह चार यंत्रांना मान्यता

#### उत्पादनवाढीपासून मजुरी बचतीपर्यंत संशोधनाचा थेट फायदा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** शेतात पिक उभे आहे; मात्र हवामानाचा लहरीपणा, रोग–किडींचा प्रादुर्भाव, वाढता उत्पादन खर्च आणि मजुरांची टंचाई यामुळे शेतकऱ्याच्या हातात शेवटी किती पैसा उरणार, हा प्रश्न कायम असतो. अशा परिस्थितीत कृषी संशोधन केंद्रात तयार होणारा प्रत्येक नवा वाण किंवा शेतकऱ्यांचे कष्ट कमी करणारे प्रत्येक यंत्र त्याच्यासाठी आशेचा किरण ठरते. याच दिशेने महात्मा फुले कृषी विद्यापीठाने महत्त्वाची झेप घेतली आहे.



संकरीत बाजरी - फुले बहिणाई



फुले सोयाबीन कापणी यंत्र

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली येथे झालेल्या ५४व्या संयुक्त कृषी संशोधन व विकास समितीच्या बैठकीत महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या संशोधनाला मोठी मान्यता मिळाली. विद्यापीठाचे ११ वाण राज्यस्तरावर आणि ११ वाण राष्ट्रीय स्तरावर मान्य करण्यात आले. त्याचबरोबर चार कृषी यंत्रे, ७७ पीक उत्पादन तंत्रज्ञान शिफारशी, सहा निष्कर्ष आणि दोन जैविक–अजैविक ताण सहन करणाऱ्या स्रोतांनाही मान्यता देण्यात आली. यातील प्रत्येक वाणामागे शेतकऱ्याची गरज लक्षात घेऊन केलेले संशोधन आहे. संकरित बाजरीचे फुले बहिणाई अधिक उत्पादन देणारे आणि काही रोगांना प्रतिकारक्षम आहे. भाताचे फुले मावळ–९ व फुले सुपर राधा हे अधिक उत्पादन आणि चांगल्या गुणधर्मांसाठी उपयुक्त ठरणार आहेत. रब्बी ज्वारीतील फुले यशस्वी आणि फुले तेजस्वी हे अनुक्रमे भारी व मध्यम जमिनीसाठी उपयुक्त आहेत. सूर्यफुलातील फुले अर्णवमध्ये अधिक बियाणे उत्पादनासह तेलाचे प्रमाणही चांगले आहे. द्राक्ष उत्पादकांसाठी मांजरी मंजुळा आणि मांजरी मधुरा हे वाण महत्त्वाचे ठरू शकतात. मांजरी मधुरा खाण्यासह बेदाण्यासाठीही उपयुक्त असून साठवण क्षमताही चांगली आहे. लसूण पातीचा भीमा हरिता वाण वर्षभर उत्पादनाची संधी देतो. चवळीचे फुले वर्षा आणि निशिगंधाचे फुले सुगंधा हे वाणही शेतकऱ्यांसाठी नव्या शक्यता निर्माण करणारे आहेत.संशोधनाची खरी ताकद मात्र यंत्रांमध्येही दिसते. लिंबू तोडताना हाताला इजा होऊ नये आणि काम अधिक **(पान ४ वर)**

## २ कोटी कर्जावर १८ कोटी व्याजाची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शहरात सावकारीचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. २ कोटी रुपयांच्या कर्जावर तब्बल १८ कोटी ३८ लाख रुपयांच्या व्याजाची मागणी करून मानसिक छळ केल्याप्रकरणी पोलिसांनी दोन सावकारांना अटक केली आहे.

**सावकार सुरेश कांकरिया, विनय होनराव यांना अटक**

याबाबत आगरकर मळा, रेल्वे स्टेशन परिसरातील रहिवासी दत्तात्रय जगन्नाथ आगरकर (वय ७७) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, त्यांनी २०१६ साली स्वतःची जमीन तारण ठेवून सुरेश मोतीलाल कांकरिया यांच्याकडून २ कोटी रुपये कर्ज घेतले होते.

या कर्जापोटी त्यांनी मुद्दल व व्याजासह ३ कोटी ७५ लाख रुपये परत केले. मात्र, पैसे परत करूनही आरोपींनी तारण असलेली जमीन परत दिली नाही. उलट व्याजावर व्याज लावून आणखी १८ कोटी ३८ लाख १४ हजार ६९५ रुपयांची मागणी करत बळकावल्याचा आणि मानसिक त्रास दिल्याचा आरोप आगरकर यांनी केला आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी सुरेश मोतीलाल **(पान ४ वर)**

# साखर उद्योगात महाराष्ट्राचाच झेंडा... पण सहकारपंढरी पिछाडीवर..!

विशेष संपादकीय — करण नवले (संपादक)

राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाने २०२४-२५ आणि २०२५-२६ या दोन वर्षांसाठी जाहीर केलेल्या राष्ट्रीय पुरस्कारांच्या निकालाने महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्राची मान उंचावली आहे. देशातील एकूण ५७ पुरस्कारांपैकी तब्बल २१ पुरस्कार महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांनी पटकावले. उत्तर प्रदेश आणि गुजरातसारख्या साखर उद्योगात आघाडीवर असलेल्या राज्यांना प्रत्येकी आठ पुरस्कार मिळाले असताना महाराष्ट्राने त्यांना मागे टाकत देशात प्रथम क्रमांक मिळविला. ही निश्चितच अभिमानाची बाब आहे.

पण या अभिमानाच्या चित्रामध्ये अहिल्यानगर जिल्ह्यासाठी एक बोचणारी पोकळी आहे. या २१ पुरस्कारांमध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातील एकाही सहकारी साखर कारखान्याचा समावेश नाही! सहकार पंढरी, सहकाराची जन्मभूमी म्हणून ओळख असलेला हा जिल्हा साखर कारखान्यांच्या स्पर्धेत किती मागे पडला आहे, हे यातून आता जवळपास सिद्ध झाले आहे. ही केवळ पुरस्कारांची बाब नाही. हा प्रश्न जिल्ह्याच्या सहकार चळवळीच्या दिशेचा, साखर उद्योगाच्या भवितव्याचा आणि गेल्या काही वर्षांतील आपल्या वाटचालीचा आहे.

एकेकाळी महाराष्ट्रातील सहकाराचे नेतृत्व करणारा अहिल्यानगर जिल्हा आज नेमका कुठे उभा आहे? ज्या जिल्ह्याने सहकाराची शक्ती अनुभवली, साखर कारखान्यांच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना दिली, हजारो शेतकरी आणि कामगारांच्या जीवनाला आधार दिला, त्याच जिल्ह्याच्या एकाही कारखान्याला राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कारांच्या यादीत स्थान मिळू नये, ही बाब निश्चितच आत्मपरीक्षणाची आहे. राष्ट्रीय पुरस्कारांसाठी कारखान्यांची निवड केवळ उत्पादनाच्या आकड्यावर होत नाही. ऊस विकास, साखर उतारा, तांत्रिक कार्यक्षमता, आर्थिक व्यवस्थापन, सहकारी व्यवस्थापन आणि सामाजिक उत्तरदायित्व अशा विविध निकषांचा विचार केला जातो. म्हणजेच पुरस्कारांच्या यादीत नाव येणे म्हणजे कारखान्याने केवळ साखर तयार केली असे नव्हे; तर कार्यक्षमता, नियोजन, आर्थिक शिस्त आणि आधुनिक व्यवस्थापनातही तो पुढे आहे, असा त्याचा अर्थ होतो.

महाराष्ट्रातील २१ कारखाने या कसोटीवर देशात ठसा उमटवतात आणि त्याच वेळी अहिल्यानगरचा एकही कारखाना या यादीत नसतो, तेव्हा आपण कुठे चुकलो? हा प्रश्न विचारावाच लागेल. आज जिल्ह्यातील सहकार क्षेत्राकडे पाहिले तर परिस्थिती अधिक गंभीर दिसते. अनेक सहकारी संस्था अडचणीत आल्या, काहींचे कामकाज थांबले. आशिया खंडात नावाजलेल्या मुळा प्रवरा वीज संस्थेचा प्रवास थांबला. नगर अर्बन बँक आणि श्रीरामपूरची पीपल्स बँक आर्थिक गैरव्यवहारांच्या संकटात सापडल्या. आता अशोक सहकारी बँकेबाबतही ठेवीदारांच्या मनात चिंता निर्माण झाली आहे. साखर उद्योगातही डॉक्टर बाबुराव तनपुरे सहकारी साखर कारखाना आर्थिक विवंचनेत सापडला असून त्याची मालमत्ता जप्त होण्याची वेळ आली. श्रीगोंदा येथील कुकडी साखर कारखान्यावरही संकट आले.

ही उदाहरणे केवळ काही संस्थांच्या अपयशाची म्हणून दुर्लक्षित करता येणार नाहीत. त्यामागे सहकारी व्यवस्थापनातील त्रुटी, आर्थिक शिस्तीचा अभाव, बदलत्या काळानुसार तंत्रज्ञान न स्वीकारणे, राजकीय हस्तक्षेप, वाढता कर्जभार आणि निर्णय प्रक्रियेतील दूरदृष्टीचा अभाव यापैकी कोणते घटक आहेत, याचा गांभीर्याने शोध घ्यावा लागेल. शेतकरी मात्र आजही ऊस पिकवतो. त्याला उत्पादन खर्च वाढतोय, पाण्याचा प्रश्न आहे, मजुरी वाढली आहे. त्याच्याकडून वेळेवर ऊस घेतला जावा, योग्य दर मिळावा आणि कारखाना आर्थिकदृष्ट्या सक्षम असावा, एवढीच अपेक्षा आहे. मग कारखाना आर्थिक अडचणीत का येतो? कर्जाचा डोंगर का वाढतो? मालमत्ता जप्त करण्याची वेळ का येते? आणि राष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कारखान्यांच्या यादीत आपला जिल्हा का दिसत नाही? याची उत्तरे केवळ सरकारकडे मागून चालणार नाहीत. कारखानदार, संचालक मंडळे, सहकारी संस्थांचे पदाधिकारी आणि जिल्ह्यातील राजकीय नेतृत्व यांनीही आरशात पाहण्याची वेळ आली आहे.

साखर कारखाना हा केवळ गाळपाचा प्रकल्प नाही. तो शेतकऱ्याच्या अर्थकारणाचा केंद्रबिंदू आहे. त्यामुळे कारखान्याचे व्यवस्थापन पारदर्शक, तंत्रज्ञानाधिष्ठित आणि व्यावसायिक असणे गरजेचे आहे. ऊस उत्पादकता वाढविणे, पाण्याचे काटेकोर व्यवस्थापन, आधुनिक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, अचूक शेती आणि स्वयंचलित यंत्रणांचा वापर ही भविष्यातील दिशा आहे. राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघही याच बाबींवर भर देत आहे. महाराष्ट्रातील २१ पुरस्कार हे राज्याच्या सहकार क्षेत्राच्या सामर्थ्याची साक्ष देतात. भिमाशंकर सहकारी साखर कारखान्याला २०२४-२५ चा आणि क्रांतीअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड सहकारी साखर कारखान्याला २०२५-२६ चा वसंतदादा पाटील सर्वोत्कृष्ट सहकारी साखर कारखाना पुरस्कार मिळणे हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. या सर्व प्रक्रियेत अहिल्यानगर जिल्हा कुठे आहे? हा प्रश्न सरकारला विचारण्याइतकाच जिल्ह्यातील साखर कारखानदारांनाही विचारण्याची वेळ आली आहे. 'सहकार पंढरी' ही बिरुदावली केवळ इतिहासाच्या पानांवर मिरवून उपयोग नाही. सहकाराची पंढरी म्हणून ओळख टिकवायची असेल तर आर्थिक शिस्त, पारदर्शकता, आधुनिक व्यवस्थापन आणि शेतकरीकेंद्रित कारभार पुन्हा उभा करावा लागेल.

पुरस्कार मिळाले नाहीत म्हणून दुःख करण्यापेक्षा पुरस्कार मिळण्याइतकी गुणवत्ता का निर्माण झाली नाही, याचा शोध घेणे अधिक महत्त्वाचे आहे. महाराष्ट्राने ५७ पैकी २१ पुरस्कार जिंकले; पण अहिल्यानगरचा एकही कारखाना त्या यादीत नाही. हा पराभव पुरस्कारांचा नाही, हा आपल्या सहकाराच्या आत्मपरीक्षणाचा इशारा आहे! अहिल्यानगरचा सहकार आता तरी जागे होणार का?

# एमपीएससी परीक्षांच्या पेपर फुटीच्या निषेधार्थ तहसीलवर विद्यार्थ्यांचा मोर्चा

**राजेंद्र परदेशी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी.** : एमपीएससीच्या परीक्षा प्रक्रियेतील पेपरफुटी आणि गैरपद्धतीने उत्तरपत्रिका तपासणीच्या निषेधार्थ राहुरीतील स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांनी आज दुपारी राहुरी शहरातील शनी मंदिरा पासून घोषणा देत राहुरी तहसील कार्यालयावर मोर्चा काढला. विद्यार्थ्यांनी तहसीलदारांना निवेदन देत गेल्या काही दिवसांतील पेपरफुटीच्या घटनांमुळे विद्यार्थ्यांमध्ये व्यवस्थेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे म्हटले आहे. या गैरप्रकारामुळे एका विद्यार्थ्याने आत्महत्या केली असून शासनाने या गंभीर प्रकाराकडे लक्ष देण्याची गरज आहे.

मागील दोन वर्षांत झालेल्या विविध परीक्षांची चौकशी करावी, दोषींवर कठोर कारवाई करावी आणि आयोगातील कार्यकारिणीत बदल करून परीक्षा प्रक्रिया अधिक पारदर्शक करावी, अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली. राज्यसेवा, कृषी सेवा आणि मुख्य परीक्षांच्या उत्तरपत्रिकांमध्ये चुकीची तपासणी आढळून येत असल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे.

चुकीच्या तपासणीमुळे विद्यार्थ्यांवर अन्याय होत असल्याने संबंधित उत्तरपत्रिकांची पुन्हा पुनर्तपासणी करावी, गट 'ब' आणि 'क' परीक्षांमधील संशयित बाबींची चौकशी करावी आणि विद्यार्थ्यांना लवकरात लवकर न्याय द्यावा, अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली आहे.




# एकल महिलांचे वॉर्डनिहाय सर्वेक्षण करा : डॉ. गावित्रे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता तसेच ४० वर्षांवरील अविवाहित एकल महिलांसाठी शासनाने आखलेल्या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शहरात घरोघरी जाऊन वॉर्डनिहाय सर्वेक्षण करावे, अशी मागणी डॉ. अशोक गावित्रे यांनी कोपरगाव नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे केली आहे. नगरविकास संचालनालयाने ५ ऑगस्ट रोजी राज्यातील नगरपरिषदा, नगरपंचायती व महानगरपालिकांना एकल महिलांचे सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र अनेक ठिकाणी केवळ वर्तमानपत्रातील जाहिराती व समाजमाध्यमांद्वारे आवाहन करून महिलांना कार्यालयात नोंदणीसाठी बोलावले जात आहे. त्यामुळे गरीब व कष्टकरी महिलांपर्यंत माहिती पोहोचत नसल्याचे डॉ. गावित्रे यांनी म्हटले आहे. प्रत्येक घरी जाऊन सर्वेक्षणासाठी आवश्यक कर्मचारी नियुक्त करावेत. बचत गट, अंगणवाडी व आशा सेविका, महाविद्यालयीन विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था, नगरसेवक व सामाजिक कार्यकर्त्यांची मदत घ्यावी, तसेच वॉर्डनिहाय सूक्ष्म नियोजन करावे, अशी मागणी त्यांनी केली. सर्वेक्षणात हलगर्जीपणा करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांवर कठोर कारवाई करावी, अशीही मागणी त्यांनी केली.

# गोदावरी कालव्यांना जास्तीत आवर्तने द्या : आ. काळे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : नाशिक धरण क्षेत्रात समाधानकारक पाऊस झाल्याने धरणे भरली असली तरी कोपरगाव मतदारसंघात सुमारे २४ दिवसांपासून पावसाचा मोठा खंड पडल्याने दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे गोदावरी कालव्यांना जास्तीत जास्त आवर्तने देण्याची मागणी आमदार आशुतोष काळे यांनी जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली.

जिल्हाधिकारी कार्यालयात शुक्रवारी झालेल्या टंचाई आढावा बैठकीस आमदार काळे यांचे प्रतिनिधी म्हणून कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष दिनार कुदळे व राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष चारुदत्त सिनगर ऑनलाइन उपस्थित होते. यावेळी कुदळे यांनी कोपरगाव तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकऱ्यांची पाणीपट्टी माफ करण्याची मागणी केली.

पावसाअभावी खरीप पिके धोक्यात आली असून वाढत्या उष्णतेमुळे अनेक गावांतील विहिरी व कूपनलिकांच्या पाणीपातळीत घट झाली आहे. जनावरांचा चारा व पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे रब्बी व उन्हाळी हंगामातील नियमित दोन आवर्तनांव्यतिरिक्त आणखी आवर्तने देण्याची गरज असल्याचे बैठकीत निदर्शनास आणून देण्यात आले.

काकडी, मल्हारवाडी, रांजणगाव देशमुख, तिळवणी, शिरसगाव-सावळगाव, मोर्वीस, अंजनापूर व उक्कडगाव येथील पाणीस्रोत बळकट करण्यासाठी विहीर दुरुस्ती, खोलीकरण व नवीन कूपनलिकांसाठी निधी द्यावा, अशी मागणी करण्यात आली. तसेच पालखेड डाव्या कालव्याच्या ओव्हरफ्लोच्या पाण्यातून पूर्व भागातील बंधारे व पाझर तलाव पुन्हा पूर्ण क्षमतेने भरून द्यावेत, अशी मागणीही करण्यात आली.

# शेतीच्या वादातून विवाहितेचा विनयभंग

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : शेतजमिनीच्या वादातून ४० वर्षीय विवाहित महिलेची शिवीगाळ करून मारहाण तसेच विनयभंग केल्याप्रकरणी चौघांविरुद्ध राहुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तुकाराम भीमराज तनपुरे, संगीता तुकाराम तनपुरे, गौरव तुकाराम तनपुरे व नितीन तुकाराम तनपुरे अशी आरोपींची नावे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिला शेतात असताना आरोपींनी 'माझ्या शेतात ठिबक का बसवत आहात? हे वावर आमचे आहे,' असे म्हणत तिच्याशी वाद घातला. महिलेने सदर शेत तिच्या वडिलांचे असल्याचे सांगितल्यानंतर आरोपींनी तिला शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. दरम्यान, संगीता तनपुरे हिने फोन करून गौरव व नितीन यांना बोलावून घेतले. त्यानंतर चौघांनी महिलेला लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. तुकाराम तनपुरे याने महिलेला खाली पाडून तिच्या अंगावर बसत ब्लाउज फाडून विनयभंग केल्याचेही फिर्यादीत म्हटले आहे. महिलेचा पती तिला सोडविण्यासाठी आला असता त्यालाही लाकडी दांडा व लोखंडी पकडीने मारहाण करण्यात आली. यात त्याच्या डोक्यासह खांदा, पाठ व मानेला दुखापत झाली. गौरव तनपुरे याने दोघांना जीवे मारण्याची धमकी दिल्याचेही फिर्यादीत नमूद आहे. पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

# मक्तापूर ग्रामपंचायतचे प्रशासक गणेश सवर्ई यांचे स्वागत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : तालूक्यातील मक्तापूर येथे ग्रामपंचायतला प्रशासक म्हणून नियुक्त झालेल्या गणेश सवई यांचे मराठा सुकाणू समितीच्या वतीने प्रदेशाध्यक्ष गणेश झगरे व मक्तापूर ग्रामस्थांच्या वतीने जंगी स्वागत करण्यात आले यावेळी गणेश झगरे म्हणाले की गेल्या तीन महिन्यापासून मक्तपुर गावाचा विकास थांबला होता. ग्रामपंचायतचे प्रशासक म्हणून गणेश सवई यांची नियुक्ती झाल्यामुळे मक्तापूर ग्रामपंचायत मध्ये कामाची गती वाढेल, सर्वसामान्यांना न्याय द्यायचं काम होईल असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी प्रशासक गणेश सवई यांनी आपल्या भाषणात मक्तापूर ग्रामस्थांनी स्वागत केल्याबद्दल धन्यवाद व आभार मानले ,कुठल्याही भेदभाव न करता सर्वांचे काम केले जातील विकास कामाला गती मिळेल सर्वसामान्य न्याय देण्याचे काम करण्यास प्राधान्य दिले जाईल, अनेकांचे घरकुल मंजूर झाल्याने त्यांच्या खात्यावर पंधरा हजार लवकर जमा होतील व ज्यांचे काम अपूर्ण आहे ते पूर्ण करण्यात येतील अशी ग्वाही यावेळी बोलतांना दिली.

यावेळी पंचायत समितीचे माजी सभापती रावसाहेब कांगुणे, पोलीस पाटील संदीप लहारे, तंटामुक्त अध्यक्ष



दत्ताभाऊ कांगुणे, माजी सरपंच साळवे, ग्रामसेवक दत्तात्रय गर्जे, गोरक्षनाथ नवघरे, सचिन गायकवाड, वंचितचे योगेश गायकवाड, शिवसेना शिंदे गटाचे मनोज झगरे, अविनाश हिवाळे, अविनाश जामदार, सुरज हिवाळे,सुधीर साळवे, संजय सातपुते, संभाजी पोपटराव बर्डे, शुभम बर्डे, मच्छिंद्र जामदार, राहुल जामदार, लक्ष्मण, तुकाराम बर्डे, मोसिम साळवे, गोरक्षनाथ नवघरे ,योगेश कांगुणे, दीपक बर्डे, अशोक साळवे, सुनील साळवे आदी मक्तापूर ग्रामस्थ या कार्यक्रमाला उपस्थित होते,

# शिवार फेरीचा उपक्रम शेतकऱ्यांसाठी ज्ञानयात्रा ठरेल : म्हस्के

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : बदलत्या काळात शेती अधिक उत्पादनक्षम, शाश्वत आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे अत्यावश्यक आहे. प्रवरा कृषी शास्त्र संस्थेच्या माध्यमातून कृषी तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम प्रभावीपणे सुरू असून, संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेली 'शिवार फेरी' शेतकऱ्यांसाठी तंत्रज्ञानाची ज्ञानयात्रा ठरेल असा विश्वास माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील यांनी व्यक्त केला.

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून आणि संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील व कृषी संचालक प्रा. उत्तमराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली प्रवरा कृषी शास्त्र संस्था, लोणी,पायरेन्स संचलित कृषी विज्ञान केंद्र, बाभळेश्वर आणि कृषी विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने प्रवरा कृषी शास्त्र संस्थेच्या प्रक्षेत्रावर शिवार फेरीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष सौ शालिनीताई विखे पाटील, विखे पाटील कारखान्याचे



विखे पाटील कारखान्याचे उपाध्यक्ष सोपानराव शिरसाठ, माजी जिल्हा परिषद सदस्य विजया अंबाडे, संस्थेच्या संचालिका रोहिणीताई निघुते, संचालक दत्ता पाटील शिरसाठ, पोपट वाणी, गणपतराव शिंदे,अशोक गागरे, बबनराव काळे, मिनाक्षी निर्मळ,ज्ञानेश्वर खर्डे, मीनाक्षी निर्मळ, तालुका कृषी अधिकारी आबासाहेब भोरे, कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ शैलेश देशमुख यांच्यासह विद्यार्थी, पालक आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शालिनीताई विखे म्हणाल्या, शेतीमध्ये नवनवीन प्रयोगांची गरज असून सेंद्रिय शेतीसह नाविन्यपूर्ण पीक पद्धतीला प्राधान्य मिळाले पाहिजे. प्रवरा कृषी शास्त्र संस्थेच्या माध्यमातून विविध पिकांवर प्रयोग सुरू आहेत. शिवार फेरीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना नवीन पिके, तंत्रज्ञान आणि शेतीतील बदल प्रत्यक्ष पाहता येत आहेत. या तंत्रज्ञानाचा शेतकऱ्यांनी आपल्या शेतात वापर करावा. तसेच शेतीला पूरक व्यवसायांमध्येही मोठ्या संधी असून शेतकऱ्यांनी त्याकडे वळण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

# संतपूजन, संतभोजनाने गोणेगावात श्रावण सांगता

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : तालुक्यातील गोणेगाव चौफुला येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी आध्यात्मिक केंद्र संचलित रामकृष्णाश्रमात श्रावण मासाची भक्तिमय वातावरणात सांगता करण्यात आली. महंत वेदांताचार्य ह.भ.प. भगवान महाराज जंगले शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली संतपूजन, संतभोजन व भजन सोहळा आयोजित करण्यात आला होता.

यावेळी गायनाचार्य चांगदेव महाराज काळे, गहिनीनाथ महाराज आढाव, गणेश महाराज गायकवाड, शहाजी महाराज चिंधे व शंकर महाराज तनपुरे यांनी विठ्ठलाची भक्तिरसपूर्ण भजने सादर केली. सेवानाथ महाराज यांनी गवळणी सादर केल्या. मृदंगाचार्यांनी सुरेल साथ दिली. आध्यात्मिक केंद्रात वारकरी संप्रदायाचे शिक्षण घेणाऱ्या बाल वारकऱ्यांनीही संगीत साथ देत सोहळ्यात रंग भरला.

विठ्ठल नामाचा गजर, टाळ-मृदंगाचा निनाद आणि संतांच्या उपस्थितीने रामकृष्णाश्रम परिसर भक्तिमय झाला होता. माजी खासदार स्व. तुकाराम गडाख यांचे चिरंजीव रविराज गडाख पाटील व भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष ऋषिकेश शेटे यांनी सोहळ्यास भेट दिली. प्रेरक बदाम महाराज पठाडे, संतभोजनाचे यजमान मंगेश महाराज वाघ व खंडागळे यांचा भगवान महाराज जंगले शास्त्री यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. संतपूजनानंतर उपस्थित संत व वारकरी भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

# नेवासा येथे पिढीजात परंपरेचे जतन !

## शेकडो बैलजोड्यांच्या मिरवणुकीने पोळा उत्साहात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात शेतीचे स्वरूप बदलत असले तरी शेतकरी आणि बैल यांच्यातील जिव्हाळ्याचे नाते आजही कायम आहे. याच परंपरेचे दर्शन नेवासा येथे बैल पोळ्यानिमित्त निघालेल्या दिमाखदार मिरवणुकीतून घडले.

नेवासा शहरातील जुन्या पेठेतील गणपती मंदिरापासून सायंकाळी सात वाजता मिरवणुकीला प्रारंभ झाला. रंगीबेरंगी सजावट केलेल्या बैलजोड्या, शिंगांना लावलेले फुगे, गळ्यातील घुंगरमाळा आणि पारंपरिक साजशृंगारामुळे संपूर्ण मिरवणूक लक्षवेधी ठरली. मिरवणुकीवर ठिकठिकाणी गुलालाची उधळण करण्यात आली. बैलांना पुरणपोळीचा नैवेद्य दाखवून विधिवत पूजन करण्यात आले.मारुती चौकातील मंदिरात नारळ वाढवून बैलजोड्यांच्या मालकांनी मारुतीरायाचे दर्शन घेतले. ग्रामदैवत श्री मोहिनीराज मंदिर मार्गे ही मिरवणूक मुख्य पेठेकडे रवाना झाली.

यावेळी शेतकरी रामेश्वर कदम यांच्या मानाच्या बैलजोडीचे पूजन करण्यात आले. नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले, लक्ष्मणराव जगताप व पोलीस निरीक्षक प्रतापराव दराडे यांच्या हस्ते टोपी, उपरणे व शाल देऊन त्यांचा



सन्मान करण्यात आला. नगरपंचायत चौकात उत्कृष्ट तब्येत व उत्तम देखणेपणा असलेल्या तीन बैलजोड्यांची निवड करण्यात आली. यामध्ये सर्जेराव लोखंडे, अण्णासाहेब बुचुडे व गंगाराम नवसे यांच्या बैलजोड्यांना मानाची झुल, शेंबी व मानाच्या शिंगदोऱ्या देऊन गौरविण्यात आले. नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले पाटील, आर. बी. गायकवाड, लक्ष्मणराव जगताप, चेअरमन दिलीपराव जामदार, रामभाऊ खंडाळे सर, दत्तात्रय शेटे, अरुण नजन, नगरसेवक स्वप्नील मापारी, दिनेश व्यवहारे, कृष्णा परदेशी यांच्या हस्ते हा सन्मान करण्यात आला.

नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले यांच्या पुढाकारातून समर्पण फाऊंडेशनच्या वतीने मिरवणुकीत सहभागी झालेल्या सर्व बैलजोड्यांना शिंगदोऱ्यांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमासाठी पंचगंगा उद्योग समूहाचे प्रमुख उद्योजक प्रभाकर शिंदे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

यावेळी बैलगाडा शर्यत कमिटीचे रविंद्र शेंडे, सुनील गायकवाड, मोहन कुटे, सिद्धीक चौधरी, विलास शेंडे, ज्ञानेश्वर जाधव, अशोकराव लोखंडे, बाबासाहेब कोरेकर, धनंजय हिरवे, शिवाजी गुडघे, विस्तार अधिकारी डॉ. राजेंद्र शेटे, अशोक नागरगोजे, माजी सरपंच सतीश गायके, शिवा राजगिरे, हारुण जहागिरदार यांच्यासह सर्व नगरसेवक, विविध पक्षांचे पदाधिकारी व नेवासकर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.पत्रकार सुधीर चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले, तर नगरसेवक स्वप्नील मापारी यांनी सर्व शेतकरी बांधवांचे आभार मानले.

# विखे पाटलांवरील बेताल वक्तव्य थांबवा : सचिन शिंदे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी** : जरांगे पाटील यांनी अनेक नेत्यांना शिवराळ भाषा वापरत असल्याने मराठा तरुण आता आक्रमक झाल्याचे बघायला मिळतं आहे. आता निझर्णेश्वर येथे जरांगे पाटील यांचा निषेध करण्यात आला असून मुख्यमंत्री फडणवीस व विखे पाटलांना दुग्धभिषेक घालून विखे व फडणवीस परती आत्मीयता दाखवण्यात आली आहे. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर करण्यात आलेल्या टीकेच्या निषेधार्थ मराठा समाजातील युवकांनी एकत्र येत श्रीक्षेत्र निझर्णेश्वर येथे अनोख्या पद्धतीने निषेध व्यक्त केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रतिमांना मराठा समाजाच्या वतीने दुग्धाभिषेक करण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस व मंत्री विखे पाटील यांच्या समर्थनार्थ तसेच मराठा समाजाच्या एकजुटीच्या घोषणा देण्यात आल्या. विखे पाटील यांनी शरद पवार यांच्यावर केलेल्या टीकेनंतरच मनोज जरांगे पाटील यांनी विखे पाटील यांच्यावर भूमिका मांडण्यास सुरुवात केल्याचा दावा उपस्थित युवकांनी केला. या पार्श्वभूमीवर राजकीय मतभेद असले तरी आरोप-प्रत्यारोप करताना संयम राखावा, अशी अपेक्षाही युवकांनी व्यक्त केली. मराठा समाजाच्या प्रश्नांवर सरकारच्या माध्यमातून सुरू असलेल्या प्रयत्नांच्या पार्श्वभूमीवर युवकांनी एकत्र येत आपली भूमिका स्पष्ट केली. समाजाच्या प्रश्नांवर सकारात्मक चर्चा होऊन त्यातून मार्ग काढण्याला प्राधान्य द्यावे, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. यावेळी भाजपा चे जिल्हा उपाध्यक्ष सचिन शिंदे यांनी जरांगे पाटील यांच्यावर आरोप करताना म्हंटले आहे की, विखे पाटील यांनी आरक्षण हे १९९४ लाच मिळायला पाहिजे होते असे विधान केले होते याचाच रोष धरून जरांगे पाटील यांनी विखे पाटलांना लक्ष्य करत शिवराळ भाषा वापरली आहे. १९९४ ला शरद पवार हे मुख्यमंत्री होते. शरद पवार यांच्यावर टीका सहन न झाल्याने जरांगे पाटील यांनी विखे पाटलांवर टीका केली आहे. यावेळी मराठा तरुणांनी जरांगे पाटील यांचा निषेध केला. यावेळी अहिल्यानगर भाजपा जिल्हा उपाध्यक्ष सचिन शिंदे, सामाजिक कार्यकर्ते रविंद्र गाडे, गोकुळ साबळे, भाऊसाहेब गुळवे, आदित्य पवार, भरत कुटे, राजेंद्र गाडे, सुशील शिंदे, धनंजय वर्पे, दत्तू हरदे, नंदू पानसरे, स्वप्नील चव्हाण, पंकज गुळवे, बाळासाहेब जोंधळे आदी उपस्थित होते.




हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द • ख • ल

## रमेश तगरे यांना पोलीस पदक मिळाल्याबद्दल सत्कार



**टाकळीभान** : येथील रमेश गिताराम तगरे यांना नूकतेच कारागृह विभागामध्ये बजावलेल्या प्रशंसनीय सेवेबद्दल पदक व सन्मानचिन्ह सन्मानीत करण्यात आले होते. या निमित्ताने टाकळीभान येथे विविध ठिकाणी, त्यांचा सत्कार करण्यात आला.

सत्काराला उत्तर देताना तगरे म्हणाले नोकरी करीत असताना निस्वार्थपणे सेवा केली, त्याचा फळ मला मिळाले. या वेळी भाजपच्या वतीने सत्कार करण्यात आला, याप्रसंगी उपसरपंच कान्हा खंडागळे, भाऊसाहेब पवार, मेजर विनोद रणनवरे, गणेश कोकणे, श्रीरामपूर एसटी संघटनेचे अध्यक्ष अमोल पटारे, ज्येष्ठ पत्रकार दिलीप लोखंडे, शामराव खरात, अमोल चितळे, प्रशांत कोकणे, अक्षय कोकणे, तसेच महादेव यात्रा कमिटीच्या वतीने तगरे यांचा सत्कार राष्ट्रवादी किसान सेनेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र कोकणे, काकासाहेब डिके यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी माजी सरपंच भाऊसाहेब मगर, धावपटू भाऊसाहेब गव्हाणे, गजानन कोकणे, बंडूपंत कोकणे, विष्णुपंत पटारे, अशोक शिंदे, राजू जाधव,आदी उपस्थित होते.

## ‘एक विद्यार्थी-एक वृक्ष’ उपक्रमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश



**लोणी** : पायरेन्स लोणी संचलित इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट अँड ॲडमिनिस्ट्रेशन (खइच-)च्या फाउंडेशन डेचे औचित्य साधून राबविण्यात आलेल्या ‘एक विद्यार्थी-एक वृक्ष’ या अभिनव उपक्रमाला विद्यार्थ्यांसह माजी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी आणि माजी विद्यार्थ्यांनी मिळून १०० हून अधिक वृक्षांची लागवड केली. स्थापना दिनानिमित्त पर्यावरण संवर्धनाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी आणि निसर्गाप्रती जबाबदारीची जाणीव निर्माण व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

वृक्षारोपण म्हणजे केवळ रोप लावणे नसून भविष्यातील पिढ्यांसाठी आशेची आणि जबाबदारीची पेरणी असल्याचे संस्थेने डॉ.मोहसिन तांबोळी यांनी सांगितले. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांसह प्राध्यापक कर्मचारी यांनीही आपला सहभाग नोंदवला.

## मत माऊली यात्रेनिमित्त रणनवरे परिवार व मित्र मंडळाच्या वतीने अन्नदान



**टाकळीभान** : हरेगाव मत माऊली यात्रेनिमित्त येणाऱ्या भाविकांसाठी टाकळीभान येथे गावातील रणनवरे व मित्र मंडळाच्या वतीने अन्नदानाची सेवा देण्यात आली.

याप्रसंगी मधुकर रणनवरे ,अनिल रणनवरे ,वसंत रणनवरे ,संदीप रणनवरे ,संदीप शिंगारे ,सुंदर रणनवरे ,मल्हार रणनवरे ,जॉन रणनवरे ,पंकज अमोलीक,विशाल रणनवरे व मित्र मंडळ उपस्थित होते. यावेळी टाकळीभानच्या अन्नदानाच्या सेवेबद्दल भक्तांनी समाधान व्यक्त केले.

# मांजरीत पारंपरिक बैलपोळ्याचा उत्साह

## सोयऱ्यांच्या हस्ते पोळा फोडण्याची अनोखी परंपरा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील मांजरी येथे शेतकरी आणि बैलांमधील जिव्हाळ्याचे नाते जपणारा बैलपोळा सण मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. हनुमान मंदिराजवळ झालेल्या पोळ्यात शेतकऱ्यांनी आपल्या बैलजोड्यांना रंगीबेरंगी झुली, शिंगांना बेगड आणि गळ्यात घुंगरांच्या माळा घालून सजवले होते.



मांजरीच्या बैलपोळ्याला गेल्या तीन वर्षांपासून अनोख्या परंपरेची जोड मिळाली आहे. गावचे जावई अर्थात सोयरे पाहुणे यांना मान देऊन त्यांच्या हस्ते पोळा फोडण्याची परंपरा सुरू करण्यात आली आहे.

यंदाही भिसे कुटुंबातील सोयरे पाहुण्यांना मानाचा फेटा व श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांच्या शुभहस्ते पोळा फोडून सणाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी गावातील ज्येष्ठ मंडळी, श्री संत चंद्रगिरीजी महाराज देवस्थान ट्रस्टचे सदस्य, मांजरी विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे पदाधिकारी, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. पोळा उत्सवात कोणताही गोंधळ किंवा डीजे न करता शांतता आणि शिस्तीने कार्यक्रम पार पडला. गावातील तरुणांनी सर्व बैलजोड्या एका रांगेत आणणे, सजावट आणि संपूर्ण नियोजनाची जबाबदारी घेत उत्सव यशस्वी केला.

परंपरा, संस्कृती आणि आपुलकीचा सुंदर संगम घडवत मांजरीकरांनी बैलपोळ्याच्या माध्यमातून गावातील एकोपा जपण्याचा आदर्श निर्माण केला.

# अबू सालेमशी संबंध...?

## प्यारे खान यांच्या हकालपट्टीची मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

श्रीरामपूर : महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांचे १९९३ मुंबई बॉम्बस्फोट प्रकरणातील दोषी अबू सालेमशी मैत्रीचे संबंध असल्याचा आरोप करत त्यांच्या तात्काळ हकालपट्टीची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात शिवप्रहारचे कार्याध्यक्ष चंदू आगे यांच्या नेतृत्वाखाली शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर रोजी श्रीरामपूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर तसेच महसूल प्रशासनाला निवेदन देण्यात आले.



अबू सालेमची नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहात अल्पसंख्याक आयोगाच्या अध्यक्षांनी भेट घेतल्याने हा विषय चर्चेत आला आहे. सालेमच्या सुटकेसंदर्भातील अर्जावर आयोगाने दखल घेतल्याचेही समोर आले आहे. मात्र, त्याच्या शिक्षेबाबत अंतिम निर्णय न्यायालयच घेणार असल्याचे प्यारे खान यांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान, देशाच्या सुरक्षेशी संबंधित गंभीर गुन्ह्यातील दोषी व्यक्तीशी अशा प्रकारचे संबंध असणे योग्य नसल्याचा दावा करत प्यारे खान यांना पदावरून तात्काळ दूर करावे, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## आजचा पाहुणा उपक्रमातून जि प शाळेच्या विद्यार्थ्यांनी जाणून घेतले पोलिस दलाचे कार्य

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : अहिल्यानगर जिल्हा परिषद अंतर्गत इयत्ता चौथीपर्यंत असलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नेवासा खुर्द मुले येथे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या आजचा पाहुणा या उपक्रमांतर्गत पोलीस कॉन्स्टेबल समीर शेख यांची विशेष मुलाखत घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी बाल पत्रकाराची भूमिका बजावत पोलिस दलाच्या कार्याविषयी विविध प्रश्न विचारून सविस्तर माहिती जाणून घेतली. शाळेच्या परिपाठात विद्यार्थ्यांना ‘मी कोण होणार?’ हा प्रश्न विचारल्यानंतर अनेक विद्यार्थ्यांनी संरक्षण क्षेत्रात जाण्याची इच्छा व्यक्त केली. विद्यार्थ्यांचा हा कल लक्षात घेऊन पोलिस दलाची कार्यपद्धती, जबाबदाऱ्या, आव्हाने तसेच पोलिस सेवेत जाण्यासाठी आवश्यक गुण याबाबत विद्यार्थ्यांना माहिती मिळावी, या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला.

मुख्याध्यापक आसिफ शेख यांच्या मार्गदर्शनाखाली व आदर्श शिक्षिका सुनिता कर्जुले यांच्या संकल्पनेतून पोलीस कॉन्स्टेबल समीर शेख यांना ‘आजचा पाहुणा’ म्हणून आमंत्रित करण्यात आले होते यावेळी बाल पत्रकार सात्विक राऊत,सफवान पटेल, आरुष लोखंडे,देवांश एरंडे,अवनीश सुकाळकर आणि जीवनराज चांदणे यांनी पोलिस दलाची दैनंदिन कार्यपद्धती, पोलिसांचे कर्तव्य, समाजातील भूमिका, आव्हाने, शिस्त, धाडस तसेच पोलिस सेवेत करिअर करण्यासाठी आवश्यक तयारी यासह विविध विषयांवर प्रश्न विचारले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त प्रश्नांना शेख यांनी मार्गदर्शनपर उत्तरे देत पोलिस सेवेशी संबंधित माहिती दिली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष संवादातून पोलिस दलाची ओळख झाली असून, प्रश्न विचारण्याची, माहिती संकलित करण्याची आणि आत्मविश्वासाने संवाद साधण्याची संधी मिळाली.यावेळी झालेल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक अण्णासाहेब शिंदे यांनी केले तर शिक्षिका कामिनी बायस यांनी मान्यवरांचे आभार मानले यावेळी मुख्याध्यापक असिफ शेख,सुनिता कर्जुले-राऊत , संध्या लोंढे,विद्या खामकर,ज्योती गाडेकर,मिनाक्षी लोळगे,अर्चना बोकारे,अश्विनी मोरे,प्रतिभा गाडेकर यांच्यासह विद्यार्थी माता पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते

## केंदळ खुर्द येथे पशुवैद्यकीय डॉक्टरवर बिबट्याचा हल्ला

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : तालुक्यातील केंदळ खुर्द येथे बुधवारी रात्री सव्वा आठ ते साडेआठच्या सुमारास दुचाकीवरून जात असलेल्या पशुवैद्यकीय डॉक्टरवर बिबट्याने अचानक हल्ला केला.



या हल्ल्यात डॉ. गौरव विजय आढाव यांच्या डाव्या पायाला बिबट्याने चावा घेतल्याने ते जखमी झाले. सुदैवाने दुचाकीवरील दोघेही प्रसंगावधान राखल्याने बचावले. या घटनेमुळे परिसरातील ग्रामस्थ, पशुपालक व दूध उत्पादक शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. केंदळ खुर्द-ब्राह्मणी शिवरस्त्यावरून पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. गौरव आढाव व डॉ. संदीप गुंजाळ हे दुचाकीवरून पशुवैद्यकीय सेवेसाठी जात होते.

यावेळी रस्त्यालगतच्या उसाच्या शेतात दबा धरून बसलेल्या बिबट्याने डॉ. आढाव यांच्यावर झडप घातली. बिबट्याने त्यांच्या डाव्या पायाला चावा घेतला. तसेच दात व नख्यांमुळे त्यांना जखमा झाल्या. डॉ. गुंजाळ यांनी जखमी आढाव यांना तातडीने टाकळीमिया येथील दवाखान्यात दाखल केले. तेथे प्राथमिक उपचार करण्यात आले. पुढील उपचारासाठी त्यांना अहिल्यानगर जिल्हा रुग्णालयात नेण्यात येणार आहे.

दरम्यान, माजी सरपंच तथा जिल्हा नियोजन समिती सदस्य अनिल आढाव यांनी वनविभागाला माहिती दिली. वनरक्षक आर. सी. आरगडे यांनी घटनास्थळी पाहणी करून आवश्यकतेनुसार पिंजरा लावण्याचे आश्वासन दिले. बिबट्याचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

दि. ०३/०८/२०२६

### वार्षिक सर्वसाधारण ३२ वी सभेची नोटीस

**(फक्त सभासदांसाठी)**

**भाग्यलक्ष्मी महिला ग्रामीण बिगर शेती सह. पतसंस्था मर्या. सुपा ता. पारनेर, जि. अहमदनगर** या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा ३२ वी. दि. २०/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वा. स्थळ पांडूरंग मंदिर सुपा, येथे संस्थेचे चेअरमन मा. सौ. ताराबाई भास्कर पवार यांच्या अध्यक्षतेखाली अजेंड्यावरील विषयांवर चर्चा करण्यासाठी आयोजीत केलेली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे हि विनंती.

**स्थळ:- पांडूरंग मंदिर सुपा. ता. पारनेर.**
**दिनांक :- २०/०९/२०२६ रोजी**
**सकाळी ११:०० वा.**

**व्यवस्थापक**
संचालक मंडळाच्या आदेशानुसार
**भाग्यलक्ष्मी महिला ग्रामीण बिगर शेती सह पतसंस्था मर्या**
सुपा ता. पारनेर, जि, अ.नगर.

**टिप:-** १) कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास ती सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने सुरु करण्यात येईल सदर सभेस कोरमची आवश्यकता असणार नाही.
२. सभासदांना कोणत्याही प्रकारची माहिती वार्षिक सर्वसाधारण सभेत पाहिजे असल्यास तसेच अहवालासंबंधी काही प्रश्न अगर सुचना दयावयाच्या असल्यास दि. १६/९/२०२६ पर्यंत कार्यालयात लेखी स्वरुपात द्याव्यात अन्यथा त्याचा विचार करणे शक्य होणार नाही. ३) सभेपुढील विषय अजेंडा संस्थेच्या नोटीस बोर्डावर लावलेला आहे.

## उंबरी बाळापूरमध्ये अनियंत्रित जेसीबी थेट अंगणात घुसला

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी** : गुरुवारी (दि. १०) सर्वत्र बैलपोळ्याचा उत्साह आणि आनंदाचे वातावरण असताना उंबरी बाळापूर (ता. संगमनेर) येथे एका अनियंत्रित जेसीबीमुळे मोठी दुर्घटना होता-होता थोडक्यात टळली. सायंकाळच्या सुमारास चालकाचे नियंत्रण सुटल्याने हा जेसीबी थेट एका घराच्या अंगणात घुसला. सुदैवाने यात कोणतीही दुर्दैवी घटना घडली नाही. गुरुवारी गावात सर्वत्र बैल पोळ्याची धूम होती. शेतकरी आपल्या सर्जा-राजाला सजवून गावात दर्शनासाठी घेऊन येत होते. सर्वत्र हर्षोल्हासाचे वातावरण असताना, रात्री ९ वाजेच्या सुमारास उंबरीहून आश्वी बुद्रुकच्या दिशेने जाणारा एक जेसीबी लक्ष्मीआई मंदिराजवळ आला. यावेळी अचानक चालकाचे जेसीबीवरील नियंत्रण सुटले. अनियंत्रित झालेल्या या जेसीबीने सुरुवातीला भानुदास बिडवे यांच्या दुकानासमोरील सिमेंटचे बाकडे तोडले. त्यानंतर थेट साळवे कुटुंबाच्या घरासमोरील अंगणात घुसत समोर उभ्या असलेल्या कॉक्रीट मिक्सर मशीनला जेसीबीने धडक दिली, त्यानंतर जेसीबी थांबला. या घटनेत मोठा आवाज झाल्यामुळे कामगार पोलीस पाटील वैशाली भगवान मैड, सुनील शिखरे, मयुर खेमनर, सुनील गाडेकर, नितिन खेमनर, ड. रविंद्र शेळके यांच्यासह स्थानिक तरुणांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य केले. घटनेची माहिती कळताच आश्वीचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाट यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर जेसीबी आणि चालकाला आश्वी पोलीस ठाण्यात नेण्यात आल्याची माहिती मिळाली आहे.

## श्रीरामपूरला खरीप तालुक्याचा दर्जा द्या : आदिक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**श्रीरामपूर** : तालुक्यातील बदललेले शेतीचे स्वरूप, वाढलेले खरीप पिकांचे क्षेत्र आणि सध्याची टंचाईसदृश परिस्थिती लक्षात घेऊन श्रीरामपूरचा खरीप हंगामी पिकांचा तालुका म्हणून शासनाच्या नोंदीत समावेश करावा, तसेच संभाव्य दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या यादीत श्रीरामपूरचा समावेश करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे महासचिव अविनाश आदिक आणि महाराष्ट्र कृषक समाज संघटनेच्या अध्यक्षा अनुराधा आदिक यांच्या नेतृत्वाखाली उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. श्रीरामपूर तालुका जुन्या नोंदीनुसार रब्बी पिकांचा तालुका म्हणून ग्राह्य धरला जात असल्याने शेतकऱ्यांना विविध शासकीय मदतीपासून वंचित राहावे लागत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. गोदावरी व प्रवरा नदीवरील बंधाऱ्यांमुळे मोठा परिसर बागायती व हंगामी बागायती झाला असून खरीप पिकांचे क्षेत्रही वाढले आहे. नेवासा, राहुरी, राहाता, कोपरगाव व संगमनेर हे लगतचे तालुके खरीप पिकांचे तालुके म्हणून नोंदले गेले आहेत. मात्र श्रीरामपूरला अद्याप हा दर्जा मिळालेला नाही. गेल्या महिनाभरात समाधानकारक पाऊस नसल्याने तसेच पाटपाण्याचे आवर्तन आणि वीजपुरवठ्यात अडचणी आल्याने खरीप पिकांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे दुष्काळग्रस्त यादीत श्रीरामपूरचा समावेश करण्याची मागणी करण्यात आली.

नि.६
दिनांक : ११/०९/२०२६
नमलेली तारीख : १७/१०/२०२६

### जाहीर नोटीस

**ॲड.ओ.जी.मोटे**
**नेवासा कोर्ट,**
**मो नं.९९७५३२१६५१**

नेवासा येथील मे. सिव्हिल जज्ज साहेब, सि.डी यांचे कोर्टात
वारस चौकशी अर्ज नं.११७/२०२६

**अर्जदार**-निखील नितीन मोटे वय ३६, धंदा शेती रा. वडाळा बहिरोबा, ता. नेवासा जि.अ.नगर

**सामनेवाले**-२. निकीता प्रतिक देशमुख वगैरे

**मयत**-भाऊसाहेब मुरलीधर मोटे, मयत दिनांक २६/१२/२०२५

वरील अर्जदार यांनी सदरचा अर्ज या मे. न्यायालयामध्ये मयतास वारस म्हणून वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज दाखल केलेला असून मयत भाऊसहोब मुरलीधर मोटे हे दिनांक २६/१२/२०२५ रोजी मयत झालेले असून मयतास अर्जदार हे कायदेशीर वारस असल्याबाबत अर्जदार यांनी मयत भाऊसाहेब मरलीधर मोटे यांचे नावावर बँक ऑफ बडोदा शाखा वडाळा बहिरोबा ता. नेवासा येथील खाते नं.२०४१०१००००७१५२ मध्ये रक्कम रुपये १,८०४८१/- अधिक व्याज, तसेच खाते नं.२०४१०२००००४०८ मधील रक्कम रुपये ४४७३२/- अधिक व्याज, व एडिसीसी बँक शाखा वडाळा बहिरोबा ता. नेवासा येथील स्टिलेज लॉकर नं. ३७ साठी बँक मॅनेजर यांचेकडे मागणी केली असता त्यांनी मा.कोर्टाचे वारसा प्रमाणपत्राची मागणी केली तसेच मयत भाऊसाहेब मुरलीधर मोटे यांचे नावावर मौजे वडाळा बहिरोबा ता. नेवासा येथे ग्रामपंचायत मिळकत नंबर ११४२ क्षेत्र १२/२० पत्राची खोली आहे व सदर मिळकतीवर त्यांचा अनुज्ञाप्ती नं.CL-III 84 BR II (कंटी लिकर व बिअर) हा परवाना होता व आहे. सदर भाऊसाहेब मुरलीधर मोटे हे मयत झाल्या नंतर अर्जदार हे मयताचे नावावर असलेला अनुज्ञाप्ती नं.CL-III 84 BR II (कंट्री लिकर व बिअर) हा परवाना व ग्रामपंचायत मिळकत स्वतः चे नावावर करण्यासाठी संबंधीत कार्यालयात गेले असता तेथील अधिकारी यांनी अर्जदार यास मा. कोर्टाचे वारस प्रमाणपत्राची मागणी केली. म्हणून सदरचा अर्ज अर्जदार यांनी दाखल केलेला होता व आहे.

त्याअर्थी सदरील वादासंबंधी कुणाचेही काही एक म्हणणे किंवा कुणाची काही एक हरकत असेल तर या जाहीर नोटीस प्रसिध्द तारखेपासून दि.१७/१०/२०२६ रोजी पर्यंत किंवा ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर वकिलांमार्फत सर्व कागदपत्रानिशी उपस्थित रहावे अन्यथा उपस्थित राहण्यास कसुर केल्यास सदरील अर्जाची सुनावणी होवून योग्य तो हुकूम केला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ११/०९/२०२६ रोजी माझी सही निशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी नोटीस दिली असे.

नेवासा
नेमलेली तारीख : १७/१०/२०२६

शिक्का

**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय, व. स्तर नेवास**

**हुकूमावरुन**
**अधिक्षक दिवाणी न्यायालय, व. स्तर नेवासा**

# माळेवाडीत सर्जा-राजाच्या कृतज्ञतेचा सोहळा

**सुधीर चव्हाण | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : मातीशी नातं, शेतीशी ऋणानुबंध आणि बैलराजाशी जिव्हाळ्याची नाळ... या संस्कृतीची साक्ष देत नेवासा तालुक्यातील प्रवरासंगमजवळ गोदावरीच्या पवित्र तीरावर वसलेल्या माळेवाडी येथे बैल पोळा सण मोठ्या उत्साहात व पारंपरिक थाटात साजरा करण्यात आला. मुळा सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन बाळासाहेब पाटील यांच्या कुटुंबाने तब्बल चौथ्या पिढीपासून जपलेली ही परंपरा यंदाही तितक्याच भक्तिभावाने आणि उत्साहाने फुलली.



शेतकऱ्याच्या जीवनात बैल म्हणजे केवळ पशुधन नव्हे, तर शिवाराचा सोबती, कष्टाचा साथीदार आणि सुख-दुःखाचा साक्षीदार! या सर्जा-राजाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पाटील परिवारात पोळ्याचा सण मोठ्या दिमाखात साजरा करण्यात आला. पोळ्याच्या निमित्ताने बैलजोडीला सुवासिक जलाने स्नान घालण्यात आले. रंगरंगोटी, आकर्षक सजावट आणि विविध साजांनी सर्जा-राजाचे रूप अधिकच खुलून दिसत होते. पाटील कुटुंबातील सुवासिनींनी एकत्र येत लाडक्या बैलराजाचे औक्षण करून विधिवत पूजन केले. त्यानंतर मिष्टान्नाचा नैवेद्य दाखवून त्यांना प्रेमाने भरविण्यात आले. ढोल-ताशांचा निनाद, फटाक्यांची आतषबाजी, गुलालाची उधळण आणि ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त सहभागाने माळेवाडीचा परिसर जणू आनंदाच्या रंगात न्हाऊन निघाला. सजलेल्या बैलजोडीची पारंपरिक मिरवणूक निघाली आणि हा देखणा सोहळा पाहण्यासाठी गावातील नागरिकांनी मोठी गर्दी केली.

**चार पिढ्यांच्या आठवणींचा वारसा...**

पाटील घराण्याचे आधारवड स्वर्गीय दादाबा पाटील यांनी आपल्या वाडवडिलांकडून आलेली पोळा सणाची परंपरा जपली. काळ बदलला, शेतीची साधने बदलली, आधुनिक तंत्रज्ञानाने शेतीचे स्वरूप बदलले; मात्र पाटील घराण्याच्या मनातील बैलराजाप्रतीची कृतज्ञता मात्र आजही तितकीच जिवंत आहे. याच संस्कारांचा वारसा चौथ्या पिढीनेही अभिमानाने पुढे नेला आहे.

यावेळी भावना व्यक्त करताना बाळासाहेब पाटील म्हणाले, बैलराजाच्या खंबीर साथीने पाटील घराण्याने उत्कर्षाची वाटचाल केली. त्यांच्या कष्टामुळे शिवार फुलले, घरात धनधान्य आले. आज आधुनिक युगात बैलांचे शेतीतील काम कमी झाले असले, तरी त्यांचे महत्त्व आणि त्यांनी केलेले उपकार आम्ही विसरलेलो नाही. म्हणूनच त्यांचे वर्षभर पालनपोषण करून पोळ्याच्या दिवशी त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची परंपरा आम्ही जपली आहे.

**परंपरा जपण्याचा अनोखा संदेश**

पोळा सणाच्या निमित्ताने बाळासाहेब पाटील व सौ. सविता पाटील यांच्या हस्ते बैलजोडीचे पूजन करण्यात आले. या सोहळ्यास पाटील कुटुंबातील बापूसाहेब पाटील, राजेंद्र पाटील, नरेंद्र पाटील, राहुल पाटील, महिंद्र पवार, सत्यदान मोहन, राजेंद्र शिंदे, सचिन पाटील, योगेश पाटील, रामनाथ बर्डे, शिवाजी पारखे, अमोल पाटील यांच्यासह माळेवाडी खालसा येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आधुनिकतेच्या वेगवान प्रवाहातही आपल्या मातीतल्या संस्कृतीची मुळे घट्ट धरून ठेवणारा हा पोळा उत्सव म्हणजे केवळ सण नव्हे, तर कष्टकरी शेतकरी आणि त्याच्या सर्जा-राजातील अतूट नात्याची भावस्पर्शी कहाणी ठरली.

RJS RASHTRASANT JANARDHAN SWAMI

Rashtrasant Janardhan Swami Foundation's

**RASHTRASANT JANARDHAN SWAMI COLLEGE OF MANAGEMENT**

(Approved by AICTE New Delhi, Recognised by DTE Govt. of Maharashtra,, Affiliated to Savitribai Phule Pune University)

Add.: Mumbai - Nagpur Highway, Kokamthan, Tal. Kopargaon, Dist. Ahilyanagar - 423 601. Contact : 9604579000 / 9970100747

E-mail : rjsmanagment@gmail.com | dranilbendre@gmail.com
website : www.rjsmanagement.in

**APPOINTMENTS**

The applications are invited from the eligible candidates for the following full time Ad hoc posts for MBA and MCA programmes for the Academic Year 2026-27.

| Course | Post | Vacancy | Category |
|---|---|---|---|
| M.B.A. | Professor | 01 | Open to all - 1 |
| | Associate Professor | 01 | Open to all - 1 |
| | Assistant Professor | 04 | SC-1, VJ-A-1, OBC-1, Open-1 |
| M.C.A. | Professor | 01 | Open to all - 1 |
| | Associate Professor | 01 | Open to all - 1 |
| | Assistant Professor | 04 | SC-1, VJ-A-1, OBC-1, Open-1 |
| | Librarian | 01 | Open to all - 1 |

Qualification, Experience, Pay Scale are as per AICTE, University and Govt. of Maharashtra norms. Candidate should apply on given mail id within 7 days from the date of publication of advertisement.

CHAIRMAN

## द•ख•ल



निर्मल ब्राईट फ्युचर स्कूलची विद्यार्थिनी आदिती मुरदारे हिचा एमबीबीएससाठी निवड झाल्याबद्दल सत्कार करताना प्राचार्य दत्तात्रय मोरे, ज्ञानेश्वर लबडे ,बाळू निळ ,बाळु कांबळे, श्रीमती रूपाली शेटे,पालक विनोद मुरदारे आदी. (छाया : दिपक खोसे ढोरजळगांव )

## संत निरंकारी मिशनतर्फे रविवारी इंग्लिश माध्यम सत्संग सोहळा

**अहिल्यानगर :** निरंकारी सदगुरू माता सुदीक्षा जी महाराज व निरंकारी राजपिता रमित जी यांच्या कृपाशीर्वादाने निरंकारी मिशनच्या अहिल्यानगर शाखेच्या वतीने युवावर्गासाठी झोनस्तरीय इंग्लिश मिडीयम समागम (एचड) निमित्त विशाल सत्संग सोहळ्याचे आयोजन



केले असून रविवार (दि.१३)रोजी सकाळी ११ ते २ या वेळेत संजोग लॉन्स,नगर-मनमाड रोड येथे मोठ्या उत्साहात कार्यक्रम होईल यात नगर शहर व जिल्हा तसेच अहिल्यानगर झोन अंतर्गत येणाऱ्या शाखांपैकी बीड, परभणी, हिंगोली, नांदेड या पाच जिल्ह्यातील युवा संत व साधसंगत चे भाविक सहभागी होणार असल्याची माहिती झोन ३६- चे झोनल इन्चार्ज हरीश खुबचंदानी यांनी दिली. त्यांनी पुढे सांगितले की,जगातील ६० हून अधिक देशात पोहोचलेली संत निरंकारी मिशनची विचारधारा इंग्रजी या जागतिक भाषेमार्फत अधिक व्यापक स्वरूपात युवकांपर्यंत पोहोचविण्याचा उद्देश या कार्यक्रमाचा असून इंग्लिश भाषेत गीत, विचार,मनोगते, कविता,नाटिका आदींच्या माध्यमातून सदगुरुंची पावन शिकवण तसेच मिशनच्या दैवी मूल्यांचा संदेश या कार्यक्रमाद्वारे दिला जाणार असल्याचे खुबचंदानी म्हणाले.

## आधार आपुलकी फाउंडेशनचा पर्यावरणपूरक व सामाजिक जपणारा सात दिवसांचा गणेशोत्सव



**अहिल्यानगर :** आधार आपुलकी फाउंडेशन, अहिल्यानगरच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही सामाजिक भान जपत पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. गणेशोत्सवाची सुरुवात पर्यावरणपूरक गणेशमूर्ती कार्यशाळेने करण्यात आली असून, या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दरम्यान, नुकत्याच झालेल्या सभेत गणेशोत्सव २०२६ साठीच्या कार्यकारिणीची सर्वानुमते निवड करण्यात आली. आधार आपुलकी फाउंडेशनच्या गणेशोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे अहिल्यानगर जिल्ह्यात ज्येष्ठ नागरिकांनी स्थापन केलेले हे एकमेव गणेश मंडळ असल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले. त्यामुळे या गणेशोत्सवाला केवळ धार्मिक उत्सवाचे स्वरूप न राहता ज्येष्ठ नागरिकांच्या सामाजिक सहभागाचे एक महत्त्वाचे व्यासपीठ म्हणून विशेष स्थान प्राप्त झाले आहे. सात दिवसांचा हा गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करताना अनावश्यक खर्चाला फाटा देऊन 'ज्येष्ठांचा समाजहित प्रबोधनासाठी आनंदोत्सव' ही संकल्पना केंद्रस्थानी ठेवण्यात आली आसुन रोज संध्याकाळी सात दिवस अहिल्यानगर मधील मान्यवरांच्या हस्ते आरती केली जाणार आहे. संवाद, नव्या गोष्टी शिकण्याची संधी, दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रम, सहली आणि धार्मिक पर्यटन अशा विविध उपक्रमांतून ज्येष्ठ नागरिकांना सक्रिय सामाजिक सहभागाची संधी मिळत आहे.

## अविनाश देडगांवकर यांना अहिल्यानगर गौरवरत्न पुरस्कार

**अहिल्यानगर :** येथील सामाजीक कार्यकर्ते व समाजसेवक अविनाश देडगांवकर यांना नुकताच अहिल्यानगर गौरवरत्न पुरस्कार जाहीर



करण्यात आला. बुधवारी एका छोटेखानी समारंभात जैन ओसवाल पथसंस्थेचे चेरमन अभय पितळे यांच्या हस्ते मोत्याचा हार घालुन शाल व पुष्प गुच्छ देऊन समाजसेवक देडगांवकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जनरल मॅनेजर प्रशांत भडांरी, संतोष गांधी उपस्थित होते.

## काका ट्रस्टतर्फे नूतन एसा संचालक मंडळाचा सन्मान



**अहिल्यानगर :** आर्किटेक्ट्स, इंजिनीअर्स अँड सर्व्हेअर्स असोसिएशन (एसा), अहिल्यानगरच्या नूतन कार्यकारिणीची नुकतीच निवड झाली असून, या संपूर्ण नूतन संचालक मंडळाचा काका ट्रस्ट, अहिल्यानगर यांच्या वतीने आयोजित गुणगौरव सोहळ्यात सन्मान करण्यात आला. आमदार संग्राम जगताप आणि आयुर्वेद शिक्षण मंडळाचे अध्यक्ष सचिन जगताप व प्रा माणिक विधाते यांच्या हस्ते एसा संस्थेचे अध्यक्ष प्रदीप तांदळे, उपाध्यक्ष सुनिल औटी, सचिव भूषण पांडव, खजिनदार संतोष खांडेकर, सहसचिव अनमोल जैन तसेच संचालक अन्वर शेख, सुनिल जाधव, सचिन डागा, संकेत पादीर, गौरव मांडगे, सागर ढगे, विजय उजनीमठ, अमेय कुलकर्णी आणि आदिनाथ आंबेकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना आ. जगताप म्हणाले की, सन्मान हा केवळ निवडीबद्दल असतो असे नाही, तर त्याचबरोबर आगामी काळात अधिक चांगले काम करण्याची जबाबदारीही आपल्यावर टाकत असतो. शहराच्या सौंदर्यात भर घालण्याचे काम आर्किटेक्ट करत असतात, तर सशक्त, सक्षम आणि नियोजनबद्ध बांधकाम करण्याचे काम इंजिनीअर्स करतात. एसा संस्था या दोन्ही क्षेत्रांमध्ये उत्तम काम करत असल्याचे त्यांनी नमूद केले. एसा संस्था मागील चाळीस वर्षांपासून शहरात कार्यरत असून, शहराच्या विकासामध्ये संस्थेचा मोठा सहभाग आहे. सभासदांचे प्रश्न सोडविताना विविध तांत्रिक तसेच सामाजिक उपक्रम संस्थेच्या माध्यमातून सातत्याने राबविले जातात. नियमावलीमध्ये होणारे बदल तसेच नवीन तंत्रज्ञानाची माहिती सभासदांना व्हावी, यासाठी विविध सेमिनारचे आयोजन केले जाते. त्यामुळे शहराच्या जडणघडणीत एसा संस्थेचा चांगला सहभाग असल्याचे आमदार संग्राम जगताप यांनी सांगितले. नवनियुक्त कार्यकारिणीचे अभिनंदन करून आ. संग्राम जगताप यांनी त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. आगामी काळात नवनियुक्त संचालक मंडळाने उत्तम कार्य करताना शहर आणि सभासदांच्या हिताचा विचार करून कार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

# गणेशोत्सवासाठी पोलीस 'अलर्ट'

## आपत्कालीन परिस्थितीसाठी 'मास्टर प्लॅन'; पाण्याचा फवारा अन् मोठा फौजफाटा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नगर तालुका :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिस यंत्रणा सज्ज झाली असून जेऊर येथे शुक्रवारी ( दि. ११) पोलिसांच्या वतीने विविध परिस्थितींमध्ये करण्यात येणाऱ्या कारवाईचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. तरुणांचे आंदोलन, घोषणाबाजी, जमावाकडून परिस्थिती चिघळण्याची शक्यता निर्माण झाल्यास करावयाची कारवाई तसेच परिस्थिती हाताबाहेर गेल्यास जमाव नियंत्रणासाठी वापरल्या जाणाऱ्या विविध उपाययोजनांची रंगीत तालीम यावेळी करण्यात आली.

जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, पोलिस उपअधीक्षक शिरीष वमने, एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहा. पोलीस निरीक्षक हेमंत थोरात आणि तालुका पोलीस ठाण्याचे सहा. पोलीस निरीक्षक गणेश वारुळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही रंगीत तालीम पार पडली. तालुका पोलीस ठाणे तसेच एमआयडीसी पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

आंदोलनादरम्यान घोषणाबाजी वाढत गेल्यास परिस्थिती कशी हाताळायची, जमाव आक्रमक होण्याची शक्यता असल्यास कोणती खबरदारी घ्यायची आणि चिथावणीखोर वक्तव्ये करून जमावाला भडकावण्याचा प्रयत्न झाल्यास कायदेशीर पद्धतीने परिस्थितीवर नियंत्रण कसे मिळवायचे याचे प्रात्यक्षिक यावेळी दाखविण्यात आले. आवश्यकतेनुसार अश्रुधुराच्या नळकांड्यांचा वापर, पाण्याचा फवारा तसेच जमावाला नियंत्रित करण्याच्या उपाययोजना यांचीही रंगीत तालीम करण्यात आली.

परिस्थिती गंभीर झाल्यास नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत रुग्णवाहिका, अग्निशमन दलाची गाडी आणि अतिरिक्त पोलीस बंदोबस्त कशा पद्धतीने तैनात केला जाईल याचेही प्रात्यक्षिक घेण्यात आले. एखाद्या घटनेनंतर जखमींना तातडीने वैद्यकीय मदत मिळावी, आगीसारखी आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास अग्निशमन दलाने तत्काळ घटनास्थळी पोहोचावे आणि त्याचवेळी पोलिसांनी परिसरातील गर्दी नियंत्रणात ठेवावी याचे नियोजन प्रत्यक्ष सरावातून स्पष्ट करण्यात आले. उत्सव पोलिसांच्या मॉक ड्रिल मुळे मोठ्या संख्येने पोलीस कर्मचारी व अधिकारी तैनात झाल्याने गावाला अक्षरशः छावणीचे स्वरूप प्राप्त झाले होते. पोलिसांच्या वाहनांची ये-जा, शिस्तबद्ध संचलन आणि विविध कारवाईंच्या प्रात्यक्षिकामुळे नागरिकांचे लक्ष वेधले गेले. गणेशोत्सवात मोठ्या प्रमाणात धार्मिक कार्यक्रम, मिरवणुका, वाहतूक तसेच सार्वजनिक ठिकाणी होणारी गर्दी लक्षात घेता कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी पोलिसांनी आधीच तयारी सुरू केली आहे. पोलिसांनी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मोठे शक्ती प्रदर्शन केले.

**रोडरोमिओंचा बंदोबस्त करणार! : हेमंत थोरात**

जेऊर परिसरामध्ये रोड रोमीओंबाबत तक्रारी असल्याची माहिती नागरिकांकडून मिळाली. यापुढे रोडरोमीओंचा कडक बंदोबस्त करणार आहे. कोणाचीही गय केली जाणार नाही. मुलींना मोकळ्या वातावरणात शिक्षण मिळावे यासाठी पोलीस प्रशासनाकडून सर्वतोपरी कडक कारवाई करण्यात येईल. सर्वांनी कायदा सुव्यवस्था राखण्यास मदत करावी.



## शेअर बाजार फसवणूक प्रकरण : आरोपींचा जामीन अर्ज सर्वोच्च न्यायालयाने फेटाळला

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**अमरापुर :** शेवगाव येथील बहुचर्चित शेअर बाजार गुंतवणूक फसवणूक प्रकरणातील आरोपी साईनाथ कल्याण कवडे याचा नियमित जामीन मिळविण्यासाठी दाखल केलेला विशेष अनुमती अर्ज सर्वोच्च न्यायालयाने फेटाळला. त्यामुळे आरोपीला सर्वोच्च न्यायालयातूनही दिलासा मिळाला नाही.

या प्रकरणातील मूळ फिर्यादी अवधूत विनायक केदार व अन्य गुंतवणूकदारांची मिळून १ कोटी ६१ लाख ४२ हजार ९०० रुपयांची आर्थिक फसवणूक झाल्याचा आरोप आहे. आरोपीने 'सिटिक सोल्युशन्स' या शेअर बाजार ट्रेडिंग कंपनीच्या माध्यमातून गुंतवणुकीवर १२ टक्के परताव्याचे आश्वासन देऊन रक्कम स्वीकारली; मात्र परतावा व मूळ रक्कम परत न केल्याची तक्रार आहे. याप्रकरणी २८ ऑक्टोबर २०२४ रोजी शेवगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

आरोपीचा जामीन अर्ज जिल्हा व सत्र न्यायालय, तसेच उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने फेटाळल्यानंतर सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल करण्यात आली होती. न्यायमूर्ती संजय कुमार व न्यायमूर्ती संजीव सचदेवा यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. उच्च न्यायालयाच्या आदेशात हस्तक्षेप करण्याचे कोणतेही ठोस कारण आढळत नसल्याचे नमूद करीत न्यायालयाने याचिका फेटाळली.

फिर्यादी अवधूत केदार व अन्य गुंतवणूकदारांतर्फे ड. संदीप देशमुख यांनी बाजू मांडली. त्यांना ॲड. प्रशांत गिरी यांनी सहकार्य केले.

## जन्म-मृत्यू दाखले बिनचूक भरा वेळेत दाखले घ्यावेत : आयुक्त डांगे

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** जन्म-मृत्यू दाखल्यांबाबत नागरिकांची गैरसोय होऊ नये तसेच सीआरएस पोर्टलवरील नोंदणीमध्ये चुका होऊ नयेत, यासाठी अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने शहरातील खासगी रुग्णालयांमधील डॉक्टर व कर्मचाऱ्यांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. जन्म-मृत्यू नोंदणी काळजीपूर्वक आणि बिनचूक करणे आवश्यक असून, नोंदणीमध्ये झालेल्या चुकांमुळे पुढे नागरिक व रुग्णांच्या नातेवाईकांना मनस्ताप होऊ नये, याची दक्षता घेण्याचे आवाहन मनपा आयुक्त यशवंत डांगे यांनी केले.

या कार्यशाळेस मनपा आयुक्त यशवंत डांगे, मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, डॉ. रणजीत सत्रे, डॉ. सी. डी. मिश्रा, डॉ. संजयकुमार धोंडे, डॉ. दीपमाला चव्हाण, डॉ. अश्विनी मरकड, प्रभाग अधिकारी राकेश कोतकर आदींसह खासगी रुग्णालयांतील डॉक्टर व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले की, जन्म-मृत्यू दाखल्यांच्या नोंदणीमध्ये अचूकता असणे अत्यंत आवश्यक आहे. सीआरएस पोर्टलवरील नोंदींमध्ये दुरुस्ती करण्यासाठी आरोग्य विभागाकडे मोठ्या संख्येने अर्ज येत आहेत. त्यामुळे अशा चुका टाळण्यासाठी रुग्णालयांनी जन्म-मृत्यू नोंदणी करताना आवश्यक ती काळजी घ्यावी. कार्यशाळेला उपस्थित नसलेल्या रुग्णालयांना नोटीस बजावावी. तसेच जन्म-मृत्यू दाखल्यासंदर्भात पुन्हा कार्यशाळेचे आयोजन करून तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन उपलब्ध करून द्यावे, असे निर्देशही आयुक्त डांगे यांनी दिले. पालकांनी आपल्या पाल्यांचे जन्मदाखले वेळेत काढून घ्यावेत. बाळाच्या नावाची नोंद पंधरा वर्षांपर्यंत करता येते. त्यानंतर नावाची नोंद करता येत नाही. त्यामुळे नागरिकांनी वेळेत जन्म-मृत्यूचे दाखले घेऊन जावेत, असे आवाहन त्यांनी केले. मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर यांनी खासगी रुग्णालयांना जन्म-मृत्यू नोंदणीबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

## शहरातील रुग्णसंख्या कमी करण्यासाठी उपाययोजना करा : आ. जगताप

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** अहिल्यानगर शहरातील नागरिकांचे आरोग्य सदृढ व निरोगी राहणे गरजेचे असून, शहराच्या विकासकामांबरोबरच नागरिकांचे आरोग्यही तितकेच महत्त्वाचे आहे. शहरातील रुग्णसंख्या वाढण्यापेक्षा ती कमी करण्यासाठी महापालिका आरोग्य विभागाने विविध उपाययोजना राबवाव्यात. शासनाच्या माध्यमातून आरोग्याच्या विविध सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. या सुविधा शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याचे काम सर्वांनी मिळून करावे, असे प्रतिपादन एकात्मिक आरोग्यवर्धिनी समितीचे अध्यक्ष आमदार संग्राम जगताप यांनी केले.

अहिल्यानगर महानगरपालिका विधानसभा मतदारसंघातील एकात्मिक आरोग्यवर्धिनी समितीची आ. संग्राम जगताप यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी महापौर ज्योतीताई गाडे, आयुक्त यशवंत डांगे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, सुभाष लोंढे, संजय घोगरे, दिपाली बारस्कर, वर्षा सानप, डॉ. सतीश राजुरकर, नगरसेवक कुमारसिंह वाकळे, नगरसेवक डॉ. सागर बोरुडे, नगरसेवक दत्ता गाडळकर, नगरसेवक निखिल वारे, सुरेश बनसोडे, प्रकाश भागानगरे, मयूर बांगरे, महेश तवले, बाळासाहेब पवार, पुष्कर कुलकर्णी, मोहित पंजाबी, विजय पठारे, करण कराळे, संजय ढोणे, रोहन सानप, महेश लोंढे, आकाश कातोरे, सुमित लोंढे, सुजय मोहिते, जितू गंभीर तसेच नगरसेविका रोशनी त्रिंबके, सोनाबाई शिंदे, वंदना ताठे आदी सदस्य, डॉक्टर, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मनपा आरोग्य समितीच्या अध्यक्षपदी नगरसेवक डॉ. सागर बोरुडे, तर सह अध्यक्षपदी नगरसेवक दत्ता गाडळकर यांची निवड करण्यात आली.

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, महापालिकेने सुरू केलेले 'डेंग्यूमुक्त अहिल्यानगर' अभियान कौतुकास्पद असून, या माध्यमातून नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात जनजागृती होत आहे. याच पद्धतीने स्वच्छता मोहीम आणि आरोग्यविषयक जनजागृती नागरिकांमध्ये करण्यात यावी.

शासनाच्या विविध योजना उपलब्ध असल्या तरी त्याची माहिती सर्वसामान्य नागरिकांना नसते.

देशात विविध कायदे मंजूर होतात; मात्र त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी किती होते, यासाठी लोकसहभागाची खरी गरज आहे. नागरिकांच्या सोयीनुसार आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

महापालिकेच्या मोफत लॅबची वेळ सकाळच्या सत्रात ठेवावी, जेणेकरून ज्येष्ठ नागरिकांना त्याचा लाभ घेता येईल. आरोग्य विभागाचे अधिकारी-कर्मचारी काम करीत असताना समाजाबद्दलची चांगली भावना, नागरिकांशी सुसंवाद, संपर्क आणि कौटुंबिक स्नेह निर्माण करावा.

या माध्यमातून आरोग्याच्या चांगल्या सुविधा नागरिकांपर्यंत सहजपणे पोहोचतील. समाजातील आर्थिकदृष्ट्या सक्षम व्यक्ती आपल्या आरोग्यासाठी चार डॉक्टर उभे करू शकतात; मात्र सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्ती आर्थिक परिस्थितीमुळे आरोग्याच्या सुविधांपासून लांब राहू शकते.

## 'पाच दिवसांचा आठवडा' बँक कर्मचारी, अधिकारी रस्त्यावर



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** पाच दिवसांचा बँकिंग आठवडा लागू करावा, कामगिरीशी निगडित प्रोत्साहनपर भत्त्यातील भेदभाव दूर करावा तसेच द्विपक्षीय करारातील तरतुदींची प्रामाणिकपणे अंमलबजावणी करावी, या प्रमुख मागण्यांसाठी शुक्रवारी युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्सच्या वतीने देशव्यापी बँक संप पुकारण्यात आला. या संपाला अहिल्यानगर जिल्ह्यातही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सावेडी येथील नगर-मनमाड महामार्गावरील फेडरल बँकेसमोर बँक कर्मचारी व अधिकाऱ्यांनी जोरदार निदर्शने करीत आपल्या मागण्यांकडे सरकार व बँक व्यवस्थापनाचे लक्ष वेधले. संपामुळे जिल्ह्यातील बँकिंग सेवा मोठ्या प्रमाणात ठप्प झाल्या. या आंदोलनात संघटनेचे कॉ. प्रकाश कोटा, कॉ. कांतिलाल वर्मा, कॉ.सुजय नळे, कॉ. चेतन बुरा, कॉ. सुमिता सोळंके, कॉ. स्वीटी कुमारी, स्मिता निंबळकर, प्रीती दहीवाल, सुजय नळे, संदीप सारोवारे, सूरज गाडे, सागर तनपुरे, मयूर जामगावकर, राजेंद्र जांबे, गणेश पांडार, समीर दंडगावले, प्रशांत गोरे, संदीप काळे, सचिन शिरसाठ, अमोल चव्हाण, अमोल चव्हाण, विजय मुस्माळे, सचिन टेंगळे, अस्मिता अडसूरे, सचिन शिरसाठ, प्रशांत गोरे, उषा सपणार, समीर धडघावले, विजय मुस्माडे, प्रतिक्षा गवळी, राजेंद्र बेरड, कॉ. शिवाजी पळसकर आदी बँक अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.

# पाणीटंचाईच्या बाबतीत अधिकाऱ्यांची नकार घंटा ऐकून घेणार नाही

## कामात सुधारणा करण्याची शेवटची संधी : पालकमंत्र्याकडून प्रशासनाची कान उघडणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी :** टंचाईची परिस्थिती आहे. प्रत्येक अधिकाऱ्यांनी कार्यक्षेत्रातील इतर अधिकाऱ्यांबरोबर संपर्क ठेवा. टंचाईचा सामना करण्याची प्रत्येकाची जबाबदारी आहे. नियमावर बोट ठेवून अथवा अडचणीं न सांगता त्यातून मार्ग कसा काढायचा याची तयारी करावी. जायकवाडी योजना व वांबोरी चारी योजनेबाबत गांभीर्यपूर्वक कामे करा. संपूर्ण प्रशासनाची सामूहिक जबाबदारी असल्याने पाणीटंचाईच्या बाबतीत शेवटची संधी देतो, पुन्हा नकार घंटा ऐकून घेणार नाही. अशा शब्दात पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी सुस्तावलेल्या प्रशासनाची कान उघाडणी केली.

पालिका इमारतीचे लोकार्पण सोहळ्यानंतर तेथील प्रशासकीय दालनामध्ये पाथर्डी शेवगाव तालुक्यातील विविध विभाग प्रमुखांची आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी आ. मोनिका राजळे, डॉ.पंकज आशिया, विजय मुळीक, विनायक देशमुख, प्रसाद मते, डॉ. उद्धव नाईक, संतोष लांडगे, राजेंद्र धस, सायली पाटील यासह शेवगाव तालुक्यातील प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

बऱ्याच कर्मचाऱ्यांचा गृहपाठ कच्चा तर काहीजण मोघम माहिती देत असल्याचे निदर्शनास येतात विखे यांनी योग्य शब्दात सर्वांनाच समज दिली.



यावेळी बोलताना विखे म्हणाले, टंचाई सदृश परिस्थितीत सर्वसामान्य माणसाला आधार मिळायला हवा. प्रमुख अधिकाऱ्यांनी मिटींगचे दौरे बंद करून ऑनलाईन मीटिंग घ्याव्यात. गरजू लोकांना व्यर्थ हेलपाटे मारावे लागू नयेत, याची काळजी घ्या. पाण्याच्या टँकर बाबत बराच विस्कळीतपणा दिसत असून टँकर पुरवठ्याचा प करा. गावच्या लोकांना त्याबाबत माहिती मिळावी. जायकवाडी योजनेचा उद्धव पाण्यात गेला असे उत्तर मान्य नाही. एवढे दिवस काम काय केले, पाण्यासाठी लोकांनी काय करायचे, पर्यायी व्यवस्था उभी करा. तुमच्या अडचणीचे जनतेला देणे घेणे नसून त्यांना प्यायला पाणी पाहिजे. दहा पंधरा दिवसांच्या अंतराने लोकांना पाणी मिळत असेल तर ही गोष्ट अत्यंत गंभीर आहे.

पाणी वाटपाचे ग्रामीण शहरी असे निकष तूर्त बाजूला ठेवत पाणी कपात करून किमान दिवसाआड पाणी देण्याचा प्रयत्न कसा होईल याबाबत पाथर्डी व शेवगाव चे गटविकास अधिकारी व दोन्ही पालिकांच्या मुख्याधिकाऱ्यांनी संयुक्त नियोजन करावे. पाण्याचे टँकर कुठून भरायचे, पर्यायी व्यवस्था काय याचा तात्काळ आराखडा तयार करा. राक्षी येथील उद्धव तातडीने पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करावा.इतिहास भूगोल सांगून प्रश्न सुटणार नाहीत. धरणात पाणी आहे, मात्र नळावाटे दहा-पंधरा दिवसातून एक वेळ कसे व का पाणी मिळते. याची कारणे शोधत अडचणी दूर झाल्याच पाहिजेत. यंत्रसामग्रीची देखभाल दुरुस्ती आम्ही येऊन करायची का? पाण्याच्या सोर्सचा पत्ता नाही. मोबाईल पंप दिले, तेथे वीज पुरवठा नाही. नेमके काय चालले आहे. कुणाची जबाबदारी आहे. असा प्रश्न संताप जनक ठरतो. व्यावसायिक पद्धतीने गाड्या धुणे बंद करा. प्रत्येकाकडून पाण्याची काटकसर व्हावी. लोकांनी सुद्धा पाणी कमी वापरावे, याबाबत प्रबोधन आवश्यक आहे.

## दखल

### गणेशोत्सवात जादा भाडे आकारणाऱ्या खासगी प्रवासी बसविरोधात तपासणी

**पुणे :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांकडून जादा भाडे आकारणाऱ्या खासगी प्रवासी बसविरोधात प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांच्या वतीने विशेष तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. गणेशोत्सवासाठी प्रवाशांकडून खासगी बसमालकांकडून जादा भाडे आकारले जात असल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. या पार्श्वभूमीवर दिनांक ११ ते २६ सप्टेंबर २०२६ या कालावधीत खासगी ट्रॅव्हल्स, बसेस यांच्याकडून शासनाने निश्चित केलेल्या भाडेदरापेक्षा अधिक भाडे आकारणाऱ्या खासगी प्रवासी बसचालक- मालकांविरुद्ध कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या त्या त्या संवर्गातील टप्पा वाहतुकीचे सध्याचे भाडेदर विचारात घेऊन खासगी कंत्राटी परवाना वाहनाने त्या संवर्गाच्या बससाठी येणाऱ्या भाड्याच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक भाडे आकारता येणार नाही. तसेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या प्रवासी तिकिटाच्या दराच्या दीडपटपेक्षा जादा भाडे आकारण्यात येऊ नये. खासगी बसमालक व चालकांनी वाहनाची कागदपत्रे वैध असल्याची खात्री करावी, असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड यांनी केले आहे. प्रवाशांकडून जादा भाडे आकारले जात असल्यास किंवा प्रवासादरम्यान कोणत्याही अडचणी आल्यास प्रवाशांनी आपले नाव, भ्रमणध्वनी क्रमांक, तिकिटाचे छायाचित्र यासह ८२७५३३०१०१ या संपर्क क्रमांकावर अथवा mh12prosecution.rtopunegmail.com या ई-मेलवर तक्रार नोंदवावी, असेही कळविण्यात आले आहे.

### गणेश विसर्जन मिरवणुकांतून व्यसनमुक्तीचा संदेश द्या

**पुणे:** गणेश विसर्जन मिरवणुकांमधून तंबाखू व अंमली पदार्थांच्या विरोधात जनजागृती अभियान राबविण्यात येणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या 'व्यसनमुक्त महाराष्ट्र' संकल्पनेला बळकटी देण्यासाठी सर्व संबंधित विभाग, संस्था आणि नागरिकांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांनी केले. राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम, जिल्हा रुग्णालयाच्या वतीने जिल्हास्तरीय समन्वय समितीची बैठक निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांच्या अध्यक्षतेखाली झाली. युवकांमध्ये तंबाखू व अंमली पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्याबाबत बैठकीत चर्चा झाली. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सहभागातून पोस्टर अभियान, जनजागृती फलक, घोषवाक्ये आणि बॅनर्सच्या माध्यमातून 'तंबाखूमुक्त पुणे–व्यसनमुक्त पुणे' हा संदेश व्यापकपणे पोहोचविण्यात येणार आहे. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे, स्वयंसेवी संस्था आणि युवकांच्या सहभागातून हे अभियान प्रभावीपणे राबविण्याचे नियोजन करण्यात आले.उपक्रमात सहभागी विद्यार्थी, स्वयंसेवक आणि स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींना जिल्हा रुग्णालयाच्या वतीने अधिकृत ओळखपत्रे देण्याचा निर्णयही बैठकीत घेण्यात आला.

### महाळुंगे पडवळ येथे बैलपोळा यात्रेला उत्साहात सुरुवात

**मंचर :** आंबेगाव तालुक्यातील महाळुंगे पडवळ येथील तीन दिवसीय बैलपोळा यात्रेला बैलांच्या सवाद्य मिरवणुकीने उत्साहात सुरुवात झाली. राज्यातील मोठ्या बैलपोळा यात्रांपैकी एक म्हणून या यात्रेची ओळख आहे.यात्रेनिमित्त शेतकऱ्यांनी आपल्या बैलांना आकर्षक सजावट करून मिरवणुकीत सहभागी केले. ग्रामदैवत दत्त मंदिरातील नंदीला बाशिंग बांधून पारंपरिक पद्धतीने मिरवणुकीचा शुभारंभ करण्यात आला. डीजेवर बंदी असल्याने यंदा ढोल, ताशे आणि बांजोच्या तालावर मिरवणुकीत उत्साह संचारला. शेतकऱ्यांनी भंडाऱ्याची उधळण करत नाचत-थिरकत आपल्या लाडक्या बैलांप्रती कृतज्ञता, प्रेम आणि आदर व्यक्त केला. पुढील तीन दिवस विविध धार्मिक व पारंपरिक कार्यक्रम होणार असून परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### विशेष मतदार नोंदणी शिबिरे १९ ते २७ सप्टेंबरला

**पुणे :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत पुणे जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रांवर १९, २०, २६ व २७ सप्टेंबर रोजी विशेष मतदार नोंदणी शिबिरे घेण्यात येणार आहेत.मतदार यादीत नवीन नाव नोंदविणे, अस्तित्वातील नोंदींमध्ये दुरुस्ती करणे तसेच नाव वगळण्यासाठी नागरिकांना या शिबिरांमध्ये अर्ज करता येणार आहे. १ ऑक्टोबर २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या नवमतदारांनाही नाव नोंदणीची संधी उपलब्ध आहे. प्रारूप मतदार यादीत नाव समाविष्ट न झालेल्या तसेच गैरहजर किंवा स्थलांतरित म्हणून नोंद राहिलेल्या पात्र नागरिकांनी सध्याच्या सर्वसाधारण रहिवासाच्या ठिकाणाहून नाव नोंदणीसाठी अर्ज करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. महिला, दिव्यांग, तृतीयपंथी, अल्पसंख्याक आणि इतर पात्र नागरिकांचा मतदार यादीतील सहभाग वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत.मतदान केंद्रस्तरीय अधिकारी १९, २०, २६ व २७ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत संबंधित मतदान केंद्रांवर उपस्थित राहणार आहेत. नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपजिल्हा निवडणूक अधिकारी मिनल कळसकर यांनी केले आहे.

# गणेशोत्सवासाठी यंत्रणा सक्षम ठेवा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** पुणे शहरातील गणेशोत्सवासाठी देशभरातून मोठ्या संख्येने नागरिक येत असल्याने वाहतूक, सुरक्षा, स्वच्छता, वीजपुरवठा आणि गर्दी व्यवस्थापनाची यंत्रणा अधिक सक्षम ठेवावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयात गणेशोत्सवाच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. शीतल तेली-उगले, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, पुणे महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे पोलीस आयुक्त अमितेश



कुमार, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे आणि पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल उपस्थित होते.

गणेशोत्सव काळात रेल्वे, बस आणि सार्वजनिक वाहतुकीने पुण्यात येणाऱ्या नागरिकांची संख्या वाढणार असल्याने गर्दीच्या वेळेनुसार अतिरिक्त मनुष्यबळ व वाहतूक व्यवस्था उपलब्ध करावी. मोठ्या सांस्कृतिक कार्यक्रमांच्या ठिकाणी स्वतंत्र वाहतूक व गर्दी नियोजन करावे. वाहतुकीतील बदल, पर्यायी मार्ग, पार्किंग व्यवस्था आणि गर्दीच्या ठिकाणांची माहिती नागरिकांना वेळेत द्यावी, अशा सूचना पवार यांनी केल्या.

**महिला, बालकांच्या सुरक्षेला प्राधान्य :**

गर्दीच्या ठिकाणी मंगळसूत्र चोरी, पाकीटमारी यांसारख्या घटना टाळण्यासाठी २४ तास पोलीस गस्त आणि प्रभावी बंदोबस्त ठेवावा. मागील वर्षातील अनुभवांच्या आधारे आवश्यक सुधारणा करून सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, असेही त्यांनी सांगितले.

ग्रामीण भागात गणेश मंडळे आणि नागरिकांना सुरळीत वीजपुरवठा मिळेल, याची दक्षता घ्यावी. विसर्जनस्थळी प्रकाशव्यवस्था, सुरक्षा आणि स्वच्छतेची पुरेशी व्यवस्था करावी. विसर्जन सुरू असतानाच सातत्याने स्वच्छता करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.गणेशोत्सव शांततेत, शिस्तीत आणि आनंदात साजरा करण्यासाठी पारंपरिक पद्धतीला प्राधान्य देतानाच उच्च न्यायालयाच्या नियमांचे पालन करावे, असे आवाहन पवार यांनी केले.

पुणे महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी मुख्य रस्त्यांवरील खड्डे दुरुस्ती, सार्वजनिक स्वच्छतागृहे, अतिरिक्त प्रकाश व्यवस्था, ध्वनिक्षेपक, सीसीटीव्ही आणि आपत्कालीन पथकांची व्यवस्था केल्याची माहिती दिली. गर्दीच्या ठिकाणी वैद्यकीय पथकेही सज्ज ठेवण्यात आली आहेत.

गर्दी लक्षात घेऊन मेट्रोनेही विशेष नियोजन केले असून मंडई स्थानकाचा वापर केवळ बाहेर पडण्यासाठी करावा. गणपती दर्शनासाठी येणाऱ्या प्रवाशांनी कसबा पेठ किंवा स्वारगेट स्थानकांचा वापर करावा, असे महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी सांगितले.

# रायरेश्वरावर विद्यार्थ्यांचा औषधी वनस्पतींचा अभ्यास

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**भोर :** राजगड ज्ञानपीठ कॉलेज ऑफ फार्मसीच्या वतीने रायरेश्वर येथे नैसर्गिक व औषधी वनस्पती अभ्यासभेटीचे आयोजन करण्यात आले. या भेटीत विद्यार्थ्यांनी डोंगराळ भागात आढळणाऱ्या विविध औषधी वनस्पती, त्यांचे औषधी गुणधर्म, पारंपरिक उपयोग तसेच संवर्धनाचे महत्त्व यांचा अभ्यास केला.

अभ्यासभेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालीच्या माध्यमातून रायरेश्वर परिसरातील विविध औषधी वनस्पतींची ओळख, त्यांचे औषधी उपयोग व पारंपरिक वापर याबाबत माहिती जाणून घेतली. तसेच दुर्गम व डोंगराळ भागात पाण्याचे संवर्धन, उपलब्ध जलस्रोतांचे व्यवस्थापन आणि शाश्वत वापर यासंदर्भातील प्रकल्पाचाही अभ्यास केला.



महाविद्यालयाचे प्राचार्य राजकुमार शेटे यांनी विद्यार्थ्यांना प्राचीन काळापासून विविध औषधी वनस्पतींचा उपचारासाठी केला जाणारा उपयोग तसेच सध्याच्या काळातील त्यांचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. औषधी वनस्पतींचे संवर्धन आणि जैवविविधतेचे संरक्षण आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

या अभ्यासभेटीत महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. राजगड ज्ञानपीठचे अध्यक्ष तथा माजी आमदार संग्राम थोपटे, जिल्हा परिषद सदस्या तथा सचिवा स्वरूपा थोपटे आणि उपाध्यक्ष पृथ्वीराज थोपटे यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यासभेटीचे आयोजन करण्यात आले.



## लाखोंचा सोन्याचा गंठण प्रामाणिकपणे परत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कवठे येमाई :** इनामगाव येथील लाँड्री व्यावसायिक गोकुळ दळवी व वनिता दळवी या दांपत्याने कपड्यांमध्ये सापडलेला अडीच तोळ्यांचा सोन्याचा गंठण प्रामाणिकपणे मूळ मालकाच्या स्वाधीन केला. त्यांच्या या कृतीतून माणुसकीची श्रीमंती दिसून आली.लाँड्रीच्या कामादरम्यान कपड्यांमध्ये सोन्याचा गंठण आढळल्यानंतर दळवी दांपत्याने गावातील विजय मोकाशी, प्रदीप पवार व गोविंद नलगे यांना याबाबत माहिती दिली. शोध घेतल्यानंतर हा गंठण सागर काळे यांचा असल्याचे समोर आले. त्यानंतर दळवी दांपत्याने कोणतीही अपेक्षा न ठेवता दागिना काळे यांच्या स्वाधीन केला.लाखो रुपये किमतीचा दागिना सापडल्यानंतरही त्याचा मोह न करता प्रामाणिकपणे परत केल्याबद्दल दळवी दांपत्याचे परिसरातून कौतुक होत आहे. या प्रामाणिकपणाबद्दल ग्रामस्थ, चंदू सराफ अँड कंपनी, दौंडचे सोनकशेठ शहा आणि सरपंच अनुराधा घाडगे यांच्या वतीने दांपत्याचा सन्मान करण्यात आला.'सोन्याचा गंठण लाखोंचा होता; मात्र तो परत करणाऱ्या दळवी दांपत्याच्या मनाची श्रीमंती करोडोंची आहे,' अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

# निकम यांनी घेतली शरद पवारांची भेट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वळती आंबेगाव :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार पक्षाचे पुणे जिल्हाध्यक्ष देवदत्त निकम यांनी पुण्यात पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार यांची भेट घेतली. या भेटीत आंबेगाव-शिरूर विधानसभा मतदारसंघातील प्रलंबित विकासकामे, सिंचन प्रकल्प तसेच आंबेगाव तालुक्यातील दूध भेसळ प्रकरणावर सविस्तर चर्चा करण्यात आली.आंबेगाव-शिरूर मतदारसंघातील अनेक वर्षांपासून रखडलेल्या महत्त्वाच्या सिंचन प्रकल्पांकडे निकम यांनी पवार यांचे लक्ष वेधले. यामध्ये डिंभे-माणिकडोह बोगदा,



आदिवासी भागातील उपसा सिंचन योजना, कळमोडी प्रकल्प, म्हाळसाकांत योजना आणि थिटेवाडी धरण आदी प्रकल्पांचा समावेश आहे. हे प्रकल्प पूर्ण झाल्यास शेतकऱ्यांना सिंचनासाठी मोठ्या प्रमाणात पाणी उपलब्ध होऊन शेतीच्या विकासाला चालना मिळेल. तसेच आदिवासी भागातील नागरिकांनाही त्याचा फायदा होणार असल्याचे निकम यांनी सांगितले.

प्रलंबित सिंचन प्रकल्पांना गती देण्यासाठी शासनस्तरावर आवश्यक पाठपुरावा करावा आणि संबंधित प्रश्न मार्गी लावण्यासाठी लक्ष घालावे, अशी मागणी निकम यांनी पवार यांच्याकडे केली. मतदारसंघातील पाणी, शेती आणि विकासाशी संबंधित प्रश्न तातडीने मार्गी लागणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, आंबेगाव तालुक्यात उघडकीस आलेल्या दूध भेसळ प्रकरणाचाही विषय बैठकीत मांडण्यात आला. दूध भेसळीमुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी निकम यांनी केली.

जनतेच्या आरोग्याशी खेळणाऱ्या प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी संबंधित यंत्रणांनी प्रभावी कारवाई करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. आंबेगाव-शिरूर मतदारसंघातील सिंचन व विकासकामांसह दूध भेसळ प्रकरणाबाबत झालेल्या या चर्चेमुळे प्रलंबित प्रश्नांना शासनस्तरावर गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.



दिवे ता. पुरंदर येथे पावसाअभावी करपू लागलेले वाटाण्याचे पीक.

# पावसाच्या ओढीने खरीप पिके संकटात

निलेश झेंडे । राष्ट्र सह्याद्री

**दिवे :** दिवे परिसरातील शेतकरी सध्या पावसाच्या प्रतीक्षेत असून, प्रदीर्घ उघडीप आणि कडक उन्हामुळे खरीप पिके करपू लागली आहेत. बाजरी, भुईमूग आणि घेवडा पिकांना पाण्याची नितांत गरज असताना जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी होत आहे. त्यामुळे पिकांवर केलेला खर्च वाया जाण्याची भीती शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे.

पावसाअभावी विहिरींची पाणीपातळीही घटत असल्याने शेतीच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. काही दिवसांत समाधानकारक पाऊस न झाल्यास खरीप पिकांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, दिवे परिसरातील अंजीर बागांवरही कोरड्या वातावरणामुळे लाल कोळीचा प्रादुर्भाव वाढला आहे. बागा वाचविण्यासाठी फवारणीचा अतिरिक्त खर्च करावा लागत असल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक भार वाढला आहे.

**पुरंदर उपसा जलसिंचन योजना सुरू करण्याची मागणी :**
**पावसाने आणखी ओढ दिल्यास परिस्थिती गंभीर होण्याची शक्यता असल्याने पुरंदर उपसा जलसिंचन योजना प्रभावीपणे सुरू करण्याची मागणी होत आहे. मात्र, योजनेच्या पाणीवाहिन्यांवरील अनेक हवेचे झडपांमधून पाण्याची गळती होत आहे. झेंडेमळा येथील झडप खराब असून, बारानळा येथेही मोठ्या प्रमाणात पाणी गळती होत आहे. या दुरुस्त्या तातडीने करून दिवे परिसरात पाणी सोडावे, अशी मागणी शेतकरी गणेश काळे व इतर शेतकऱ्यांनी केली आहे.**

# दगडूशेठ गणपतीच्या 'प्रेम मंदिर' सजावटीचे सोमवारी उद्घाटन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट आणि सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे गणेशोत्सवाच्या १३४व्या वर्षानिमित्त वृंदावन येथील 'प्रेम मंदिरा'ची भव्य प्रतिकृती साकारण्यात आली आहे. सोमवारी, १४ सप्टेंबर रोजी सकाळी ११.११ वाजता श्रीहित मोहितमराल गोस्वामीजी महाराज यांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठापना होणार असून, सायंकाळी ७ वाजता महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते विद्युतरोषणाईचे उद्घाटन होणार आहे.प्राणप्रतिष्ठापनेपूर्वी सकाळी ८.३०



वाजता फुलांनी सजविलेल्या मयूर रथातून गणपतीची आगमन मिरवणूक काढण्यात येणार आहे. दुपारी १२ वाजल्यापासून भाविकांना दर्शन घेता येणार आहे.

सुमारे १२० फूट लांब, ९० फूट रुंद आणि १०० फूट उंच असलेल्या या प्रतिकृतीमध्ये उत्तर भारतीय मंदिर वास्तुकला, राधा-कृष्णाच्या मूर्ती, कृष्णलीलेवरील शिल्पपट, फुलांची सजावट आणि विद्युतरोषणाईची वैशिष्ट्ये आहेत.

ऋषिपंचमीनिमित्त १५ सप्टेंबर रोजी ३५ हजार महिलांचे सामूहिक अथर्वशीर्ष पठण होणार आहे. यासह हरिजागर, सामूहिक सूर्यनमस्कार, अग्निहोत्र, वेदपठण, महिला हळदीकुंकू आणि गणेशयाग आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. २४ सप्टेंबर रोजी सामूहिक सत्यविनायक पूजेचे आयोजन असून, २५ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्दशीला सांगता मिरवणूक निघणार आहे.

जय गणेश आरोग्यसेवा अभियानांतर्गत मंदिर परिसरात तीन ठिकाणी २४ तास मोफत वैद्यकीय मदत केंद्रे, १० बेडची अतिदक्षता सुविधा आणि ५५ वैद्यकीय तज्ज्ञांची टीम कार्यरत राहणार आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पाच आणि ट्रस्टच्या चार अशा नऊ रुग्णवाहिका विनामूल्य सेवा देणार आहेत. अतिदक्षता विभागातील रुग्ण आणि वृद्धाश्रमातील ज्येष्ठांना अद्ययावत तंत्रज्ञानाद्वारे थेट गणपतीचे दर्शन घडविण्यात येणार आहे.

पुणे, पिंपरी-चिंचवड आणि कॅन्टोनमेंट बोर्ड हद्दीतील गणेशभक्तांसाठी ट्रस्टतर्फे ५० कोटी रुपयांचा विमा काढण्यात आला आहे. उत्सव परिसरात १५० सीसीटीव्ही कॅमेरे, २५० खासगी सुरक्षारक्षक आणि चार एलईडी स्क्रीनची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच ट्रस्टच्या संकेतस्थळ, ॲप आणि समाजमाध्यमांद्वारे २४ तास ऑनलाइन दर्शनाची सुविधा उपलब्ध आहे.

**जाहीर नोटीस**

या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, माझे पती **कै. विठ्ठल गेणू कोंढरे** याचे दि. १०/११/२०२३ रोजी निधन झाले. त्याच्या नावे पिंपरी-चिंचवड आर.टी.ओ. मध्ये नोंद असलेली Mahindra & Mahindra कंपनीचे मालवाहू मॉडेल Mahindra Bolero F BED BS III फोर व्हिलर LMV गाडी नं.MH14 EM 6094 **चॅसिज नं.** MA1ZN2GHKF1K80438 **इंजिन नं.** GHF1K38804, **कलर** - White असा आहे. कायदेशीर वारसदार म्हणून मी माझ्या नावे सदर वाहन हस्तांतर करण्यास उप-प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी-चिंचवड कार्यालय यांच्याकडे कागदपत्रे सादर करीत आहे. सदर वाहनासंदर्भात जर कोणाचीही कसलीही तक्रार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसांचे आत लेखी स्वरुपात कळवावे. अन्यथा आपल्यापैकी कोणाचीही कसलीही तक्रार नाही. असे गृहित धरुन सदर वाहन मी माझ्या नावे हस्तांतर करुन घेत आहे. याची कृपया नोंद घ्यावी.

**श्रीमती रुक्मिणी विठ्ठल कोंढरे**
रा.उकसान, ता.मावळ, करंजगाव,
पुणे - ४१० ४०५ महाराष्ट्र
मो.७०३८४९३५३२

## द•ख•ल

### डिंभा बोगदा कामाला स्थगिती हा नगर जिल्ह्यातील जनतेवर अन्याय : लामखडे

**निघोज :** राज्याचे जलसंपदामंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी डिंभा बोगद्याचे काम मंजूर करुण अहिल्यानगर जिल्ह्यातील दक्षीण भागातील जनतेला पाण्याचा फायदा होण्यासाठी मोठ्या प्रमाणात योगदान देऊन जनतेला न्याय देण्याचे काम केले मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व त्यांच्या मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांनी मात्र या कामाला स्थगिती देऊन अहिल्यानगर जिल्ह्यातील सातत्याने



दुष्काळी असणाऱ्या तालुक्यावर अन्याय केला असून याविरोधात तालुक्यातील सर्व पाणीवापर संस्थांची बैठक घेऊन पाणी वापर संस्थांचे शिष्टमंडळ आमदार काशिनाथ दाते यांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटणार असल्याची माहिती शिखर पाणी वापर संस्थेचे मुख्य पदाधिकारी चंद्रकांत लामखडे यांनी दिली आहे. लामखडे यावेळी म्हणाले पारनेर तालुका आज कायमस्वरूपी दुष्काळी तालुका आहे. कुकडी डावा कालव्याचे पाणी तसेच पिंपळगाव जोगा धरणाचे पाणी मोजून वीस ते बावीस गावांना मिळत आहे. तसेच कर्जत, जामखेड व श्रीगोंदा तालुक्यातील जमीन सुद्धा पुर्णपणे ओलीताखाली नाही. पारनेरचे शेतकरी पुणे जिल्ह्यातील साखर कारखान्यांना ऊस पुरवठा करतात याचा विचार सगळ्यांनीच करण्याची गरज असून डिंभा बोदग्याचे काम झाले पाहिजे ही मागणी अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रत्येक जनतेची असल्याने या कामाची स्थगीती उठविण्यासाठी सर्वपक्षीय नेत्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेण्याची गरज आहे. पारनेर तालुक्यातील सर्व पाणीवापर संस्थांची लवकरच बैठक घेऊन यावर सविस्तर चर्चा करुण आमदार काशिनाथ दाते यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटणार असल्याची माहिती लामखडे यांनी दिली आहे.

### शनिवारी श्री. अंबिका माता मुर्ती प्राणप्रतिष्ठापणा कार्यक्रम सुरू

**निघोज :** राज्यातील जागृत देवस्थान असलेल्या देवीभोयरे येथील श्री.अंबिका माता नवीन मुर्तीचा प्राणप्रतिष्ठापणा कार्यक्रम मोठ्या उत्साहात शनिवार दि.१२ व रविवार दि.१३ या दोनदीवशी सुरू



होणार असून राज्यातील हजारो भक्तगण या कार्यक्रमासाठी येणार आहेत. गेली अनेक वर्षाची पुराणकालीन मुर्ती असल्याने ग्रामस्थ व राज्यातील भावीकांनी अंबिका देवी देवस्थान ट्रस्ट व ग्रामस्थ तसेच मुंबईकर मंडळ यांना अंबिका मुर्ती नवीन तयार करून घेण्याची मागणी केली होती. अंबिका देवस्थान ट्रस्ट यांनी करुण देणगीचे आवाहन केल्यानंतर जवळपास ५५ लाख रुपयांपेक्षा जास्त देणगी लोकसहभागातून जमा झाली. सिंहासन, मुर्ती तसेच दागीणे यामध्ये करण्यात आले असून या नवीन मुर्तीची प्रतिष्ठापना कार्यक्रम लाखो भावीकांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. देवीचा नवरात्र उत्सव ट्रस्ट व गावकरी मोठ्या उत्साहात साजरा करीत असतात या दहा ते बारा दिवसात लाखो भाविक उपस्थित असतात. या नवीन मुर्तीची प्रतिष्ठापना कार्यक्रमास भावीकांनी मोठ्या संख्येने येण्याचे आवाहन अंबिका देवस्थान ट्रस्ट, समस्त ग्रामस्थ व देवीभोयरे, मुंबईकर मंडळी आदिंनी केले आहे.

### राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभाग प्रदेश सरचिटणीसपदी भगवानराव गोरखे

**श्रीगोंदा :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या सामाजिक न्याय विभागाच्या महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीसपदी भगवानराव दादुजी गोरखे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सामाजिक न्याय विभागाचे महाराष्ट्र प्रदेश राज्यप्रमुख पंडित प्रल्हाद कांबळे यांनी नियुक्तीपत्राद्वारे ही जबाबदारी सोपविली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासाठी गोरखे यांनी केलेले संघटनात्मक योगदान तसेच सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या



कार्याची दखल घेत पक्षाने त्यांच्यावर प्रदेश पातळीवरील महत्त्वाची जबाबदारी सोपविली आहे. या नियुक्तीमुळे श्रीगोंदा तालुक्यातील राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांना पक्षाच्या विचारांशी जोडणे, संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करणे आणि पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खा. शरदचंद्र पवार यांचे विचार तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे काम आपण प्रभावीपणे करणार असल्याचे गोरखे यांनी सांगितले.दरम्यान, नवनियुक्त प्रदेश सरचिटणीस भगवानराव गोरखे यांचा नागरी सत्कार करण्यात आला. गोरखे यांच्या नियुक्तीचे पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच सामाजिक क्षेत्रातील विविध मान्यवरांकडून स्वागत करण्यात येत असून, त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.प्रदेश पातळीवरील या जबाबदारीमुळे श्रीगोंदा तसेच अहिल्यानगर जिल्ह्यात पक्षाच्या सामाजिक न्याय विभागाच्या संघटन विस्ताराला बळ मिळेल, अशी अपेक्षा कार्यकर्त्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

### मुंगादेवी विद्यालयात चिमुकल्यांच्या हातून साकारले इको फ्रेंडली बप्पा



**हातगाव :** जनता शिक्षण प्रसारक मंडळ दहीगाव - ने संचालित शेवगाव तालुक्यातील मुंगी येथील मुंगादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शाडूच्या मातीपासून गणेश मूर्ती बनवण्याची विशेष कार्यशाळा उत्साहात पार पडली. गणेशोत्सवात प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी) ऐवजी पर्यावरणपूरक शाडूच्या मातीच्या मूर्तींचा वापर व्हावा आणि विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासूनच निसर्ग संवर्धनाची आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने रामेश्वर दसपुते यांनी कल्पना मांडली व विद्यार्थ्यास माती माती व रंगासाठी विद्यालयास सहकार्य केले. मुख्याध्यापक इकरार शेख यांच्या प्रेरणेने व विद्यालयातील कला शिक्षक सचिन पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली सदर उपक्रम राबवण्यात आला. या कार्यशाळेत इयत्ता पाचवी ते दहावी पर्यंतच्या असंख्य विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. सचिन पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली माती मळण्यापासून मूर्तीला अंतिम आकार देण्यापर्यंत प्रत्येक टप्पा विद्यार्थ्यांकडून करून घेण्यात आला. या स्तुत्य उपक्रमाबद्दल संस्थेचे अत्यंत कर्तृत्ववान नरेंद्र घुले, चंद्रशेखर घुले, राजश्रीताई घुले, डॉ. क्षितिजभैया घुले, कारभारी नजन, विजय काशिद, इकरार शेख, सचिन पंडित, सर्व शिक्षकवृंद व पालकांनी सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. पालक पानझडे यांनी कार्यशाळेत भेट देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# एमपीएससी सचिवाच्या तोंडाला काळे फासले

## अध्यक्षांचाही नंबर लागणार : संभाजी ब्रिगेडचा इशारा



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** एमपीएससी औषध निरीक्षक पेपर फुटी प्रकरणी राज्य सरकारने कोणतीही ठोस कारवाई न केल्याने अखेर संभाजी ब्रिगेडने आक्रमक पवित्रा घेतला आहे. चझडउ चे सचिव महेंद्र हरपाळकर यांच्या तोंडाला संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी काळे फासत या भ्रष्ट व्यवस्थेचा जाहीर निषेध केला आहे. ही कारवाई संभाजी ब्रिगेडचे प्रदेश उपाध्यक्ष अण्णासाहेब सावंत, मुंबई अध्यक्ष सुहास राणे आणि योगेश पाटील यांनी केली आहे.

याप्रकरणी संभाजी ब्रिगेडने इशारा दिला होता ३ ऑगस्ट रोजी चझडउ पेपर फुटी प्रकरणी संभाजी ब्रिगेडने राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांसमोर धरणे आंदोलन केले होते. त्याचवेळी प्रदेशाध्यक्ष ड. मनोज आखरे यांनी इशारा दिला होता की, सरकारने कारवाई नाही केली तर तीव्र आंदोलन छेडले जाईल. सरकारने या इशाऱ्याकडे दुर्लक्ष केल्याने आजची प्रतिक्रिया उमटली आहे.

याबाबत माहिती देताना अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष राजेश परकाळे म्हणाले, हा हल्ला कोणत्याही व्यक्तीवर नाही, तर या सडलेल्या व्यवस्थेवर आहे. काळे फासणारे संभाजी ब्रिगेडचे प्रदेश उपाध्यक्ष अण्णासाहेब सावंत, मुंबई अध्यक्ष सुहास राणे, योगेश पाटील यांच्या पाठीशी संभाजी ब्रिगेड ठामपणे उभी असल्याचे राजेश परकाळे यांनी सांगितले.

या घटनेनंतर प्रदेशाध्यक्ष ॲड. मनोज आखरे यांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. चझडउ चा अभ्यास करणाऱ्या २५ लाख विद्यार्थ्यांच्या आणि महाराष्ट्रातील १२ कोटी जनतेच्या वतीने संभाजी ब्रिगेडने या भ्रष्ट व्यवस्थेच्या तोंडाला काळे फासले आहे. महेंद्र हरपाळकरच्या थोबाडीत मारली आहे ती या सरकारला जनतेच्या वतीने संभाजी ब्रिगेडने मारलेली थप्पड आहे. सरकार गेंड्याच्या कातडीचे आहे, त्यांना ज्या भाषेत समजते त्या भाषेत सांगितले पाहिजे.

एमपीएससी चे अध्यक्ष व सचिव यांनी तत्काळ राजीनामा दिला नाही, तर पुढचा नंबर हा चझडउ अध्यक्षांचा असेल यात तिळमात्र शंका नाही, असा थेट इशारा आखरे यांनी दिला आहे.

यापूर्वी आपल्या आवाहनात ॲड. आखरे म्हणाले होते की, आज प्रश्न फक्त एका पेपरफुटीचा नाही, प्रश्न आहे शिक्षणाच्या विश्वासार्हतेचा, लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याचा, संविधानाने दिलेल्या समान संधीच्या अधिकाराचा.

तर संभाजी ब्रिगेडचे महासचिव सौरभ खेडेकर म्हणाले छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य दिले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान दिले, महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाचा प्रकाश दिला. आता त्या प्रकाशाचे रक्षण करणे ही आपली जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी तडजोड नाही! शिक्षणावर अन्याय सहन नाही. दरम्यान आंदोलकांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

## राशीन जि.प. प्राथमिक शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी विजयकुमार साळवे



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**राशीन :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा राशीन येथे शाळा व्यवस्थापन समितीच्या पुनर्गठनासाठी आयोजित पालक मेळाव्यात विजयकुमार साळवे यांची अध्यक्षपदी, तर निलेश चव्हाण यांची उपाध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली. पालकांच्या उत्स्फूर्त सहभागात पार पडलेल्या या निवडीने शाळा व्यवस्थापन समितीला नवी नेतृत्वाची दिशा मिळाली आहे.

शासनाच्या नवीन धोरणानुसार शाळा व्यवस्थापन समितीची निवड करण्यासाठी या पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती उज्वला गायकवाड उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित पालकांचे स्वागत करण्यात आले. मुख्याध्यापक अशोक नेवसे यांनी शाळा व्यवस्थापन समितीची जबाबदारी व कर्तव्ये तसेच निवड प्रक्रियेचे निकष याबाबत शासन आदेशाचे वाचन करून माहिती दिली.

त्यानंतर निवड प्रक्रिया सुरू करण्यात आली. प्रत्येक वर्गातून आरक्षणानुसार पुरुष व महिला सदस्यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. पालकांमधून एकूण १६ सदस्य निवडण्यात आले. त्यानंतर शिक्षणप्रेमी सदस्य म्हणून माजी विद्यार्थी निलेश पवार यांची निवड करण्यात आली.

पालक प्रतिनिधी म्हणून सुरेखा आढाव, सुशीला गंगावणे, रोहित साळवे, सचिन आढाव, किरण उकिरडे, सपना साळवे, सागर मासाळ, उमेश पंडित, रेशमा लष्करे, तब्बसूम बेग, वसीम तांबोळी, मनीषा जाधव, प्रतीक्षा कांबळे व नागेश्वर मरकाम यांची निवड करण्यात आली. उज्वला पंडित शिक्षक प्रतिनिधी, तर मुख्याध्यापक अशोक नेवसे सचिव म्हणून काम पाहणार आहेत.

निवडीनंतर नूतन अध्यक्ष विजयकुमार साळवे व उपाध्यक्ष निलेश चव्हाण यांचा उपस्थितांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी विशाल रेणुकर, सचिन साळवे, श्रीकांत साळवे, अमोल आढाव, श्रीकांत साळवे, निलेश जांभळकर व अमोल पंडित यांच्यासह पालक उपस्थित होते. तसेच मुलांच्या शाळेचे शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष अतुल साळवे आणि मुलींच्या शाळेचे अध्यक्ष अमोल जाधव उपस्थित होते.

## कृषि विज्ञान केंद्र, दहिगाव - ने येथे शेतकरी-शास्त्रज्ञ सुसंवाद मेळावा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**ढोरजळगांव :** शेवगांव तालुक्यातील दहिगाव-ने श्री मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्थेच्या कृषी विज्ञान केंद्र, दहिगाव-ने येथे दिनांक ८ व ९ सप्टेंबर २०२६ रोजी शेतकरी-शास्त्रज्ञ सुसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी शेतीमधील आधुनिक तंत्रज्ञान बद्दल केव्हीक शास्त्रज्ञानी व जिल्ह्यातील प्रयोगशील व प्रगतशील शेतकऱ्यांनी मार्गदर्शन केले. संस्थेचे अध्यक्ष मा. आ. डॉ. नरेंद्र घुले पाटील, मा. आ. चंद्रशेखर घुले पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेचे कामकाज सुरू आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन कृषी विज्ञान केंद्र, दहिगाव-नेचे प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. एस. एस. कौशिक यांच्या हस्ते झाले.यावेळी शेतकऱ्यांना विविध आधुनिक कृषी तंत्रज्ञानाबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात आले. कांदा पिकामध्ये एकरी ३० टन उत्पादन या विषयावर प्रगतिशील शेतकरी सर्फराज सय्यद कंकर (आव्हाने बु.) यांनी आपले अनुभव व उत्पादन तंत्रज्ञान शेतकऱ्यांसमोर मांडले. चांगल्या बियाणाची निवड, मल्चिंग-बेड-ठिबक सिंचन व लागवड पद्धतीमध्ये बदल करून काटेकोर पद्धतीने कांदा शेती केल्यास एकरी ४०-४५ टन पर्यंत उत्पादन येऊ शकते याची खात्री सर्फराज सय्यद यांनी दिली. त्यांनी स्वतः एकरी ३३ टन उत्पादन गत हंगामात घेतलेले आहे. हर्षवर्धन ताठे प्रगतशील शेतकरी चितळी यांनी कमी जागेमध्ये जास्त उत्पादन या विषयावर मार्गदर्शन केले.



ऊस शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर हा आधुनिक तंत्रज्ञानावर आधरित विषय असून ती काळाची गरज ठरत आहे. या विषयावर फायलो तंत्रज्ञानचे विक्री व विपणन राज्य प्रमुख विशालकुमार मिरजे यांनी मार्गदर्शन केले. तसेच सेंद्रिय भाजीपाला : संधी व मार्केटिंग या विषयावर सौ. कल्याणी मुरदारे यांनी माहिती दिली. नैसर्गिक व सेंद्रिय शेती तसेच विविध पिकांमधील आधुनिक तंत्रज्ञान या विषयावर केव्हीके दहिगाव-ने चे प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. एस. एस. कौशिक यांनी मार्गदर्शन केले. आधुनिक कृषी यंत्रे व औजारे, काटेकोर पाणी व्यवस्थापन आणि सूक्ष्म सिंचन यावर विषय विशेषज्ञ (कृषी अभियांत्रिकी) इंजी. राहुल पाटील यांनी मार्गदर्शन केले. दुग्ध व्यवसायातील आधुनिक तंत्रज्ञान या विषयावर विषय विशेषज्ञ (पशुविज्ञान) डॉ. सी. एन. गवळी यांनी शेतकऱ्यांना माहिती दिली. कार्यक्रमांतर्गत कृषी विज्ञान केंद्राच्या प्रक्षेत्रास भेट देऊन विविध प्रात्यक्षिकांची माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली. ही प्रक्षेत्र भेट प्रकाश हिंगे, प्रक्षेत्र व्यवस्थापक यांनी घडवून आणली.

## राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेसाठी कुमार-कुमारी गटाची निवड

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या परिपत्रकानुसार अहिल्यानगर जिल्हा कुमार व कुमारी गटाची राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेला शनिवार (ता. १२)पासून सुरवात होणार आहे.

कुमार गटाची राज्य अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धा ८ ते ११ ऑक्टोबर २०२६ दरम्यान पालघर येथे, तर कुमारी गटाची स्पर्धा ३० ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर २०२६ दरम्यान सिंधुदुर्ग येथे होणार आहे. निवड चाचणीसाठी कुमार खेळाडूंसाठी ७५ किलो, तर कुमारी खेळाडूंसाठी ६५ किलो वजन मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. कुमार खेळाडूंचा जन्म ५ नोव्हेंबर २००६ किंवा त्यानंतरचा, तर कुमारी खेळाडूंचा जन्म ३० नोव्हेंबर २००६ किंवा त्यानंतरचा असणे आवश्यक आहे. खेळाडूंनी अद्ययावत आधारकार्ड, दहावीचे बोर्ड प्रमाणपत्र, जन्मदाखला, शाळा किंवा महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र आदी आवश्यक कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. कागदपत्रांची छाननी झाल्यानंतरच खेळाडूंना निवड चाचणीत सहभागी होता येणार आहे.

अहिल्यानगर जिल्हा कबड्डी असोसिएशनतर्फे दि.१२ व १३ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत अर्ज व कागदपत्रांची प्रक्रिया करण्यात येणार असल्याचे पत्रकात नमूद करण्यात आले आहे. ही प्रक्रिया रेणू बिल्डकॉन ऑफिस, गंगा उद्यानाजवळ, टी.व्ही. सेंटर, मिस्कीन नगर, सावेडी, अहिल्यानगर येथे होणार आहे. जिल्ह्यातील सर्व इच्छुक खेळाडू व संघांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्वतयारी करून छाननी करून घ्यावी, असे आवाहन जिल्हा कबड्डी असोसिएशनचे सचिव शशिकांत गाडे यांनी केले आहे.



## संदीप वराळ जनसेवा फौंडेशनचे कार्य कौतुकास्पद : लंके

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**निघोज :** साईबाबा नगर परिसरातील लंके वस्ती तसेच आसपासच्या तीनशे पेक्षा जास्त शेतकऱ्यांना शेतीसाठी नवीन जनीत्र देऊन संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ यांनी विकासाभिमुख योगदान दिले असल्याचे प्रतिपादन मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे माजी पदाधिकारी नानापाटील लंके यांनी व्यक्त केले आहे. साईबाबा नगर परिसरातील लंके वस्ती तसेच आसपासच्या जवळपास तीनशे शेतकऱ्यांना विजेचा प्रश्न निर्माण झाला होता. संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ, माऊली वरखडे, विठ्ठलराव लंके, भास्कर लंके, स्वप्निल लंके, संकेत लंके, तेजस लामखडे, चिंतामण गुंड, पोपट लंके, रोहिदास काळे, गुलाब काळे, बबन लंके, रवींद्र लंके, विठ्ठल गुंड, शेखर लंके, नामदेव शिंदे, कृष्णा वारे, जगदीश लंके, अनिल लंके, ज्ञानेश्वर लंके, भीमराव लंके, संजय लंके, अर्जुन लंके, मयूर लंके, पंढरी लंके, राजू लंके, सचिन लंके, विलास लंके, लहू काळे ठेकेदार ऋषि वराळ आदी तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

## शिवसेना नगरसेवकांच्या उपोषणाचा अखेर 'दणका'



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** नगरपरिषदेत विकासकामे व निधी वाटपात शिवसेना नगरसेवकांवर अन्याय होत असल्याचा आरोप करत गटनेते श्रीकृष्ण उर्फ बापूशेठ बबन धुमाळ यांच्यासह नऊ नगरसेवकांनी ११ सप्टेंबरपासून पुकारलेल्या उपोषणाची प्रशासनाला अखेर दखल घ्यावी लागली. मुख्याधिकारी पुष्पगंधा भगत यांनी विविध मागण्यांवर लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलनकर्त्यांनी उपोषण स्थगित केले. शिवसेना नगरसेवकांनी नगरपरिषद प्रशासनाकडे सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान, नागरी दलितेतर निधी तसेच जिल्हा नियोजन निधीचे न्याय्य व पारदर्शक वाटप करावे, संबंधित प्रभागातील नगरसेवकांच्या शिफारशी व मंजुरीचा विचार करावा आणि शिवसेना नगरसेवकांसाठी स्वतंत्र दालन उपलब्ध करून द्यावे, अशा मागण्या केल्या होत्या.या मागण्यांवर प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेत निधीचे वाटप शासनाच्या प्रचलित नियम, मार्गदर्शक सूचना व उपलब्ध निधीच्या तरतुदीनुसार न्याय्य आणि पारदर्शक पद्धतीने करण्यात येईल, असे लेखी आश्वासन दिले. तसेच येत्या आठ दिवसांत नगरपरिषद कार्यालयात शिवसेना नगरसेवकांसाठी स्वतंत्र दालन उपलब्ध करून देण्यात येईल, असेही पत्राद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे.

# कर्जतला पावसासाठी मुस्लिम समाजाची विशेष नमाज

**डॉ अफरोजखान पठाण । राष्ट्र सह्याद्री**

**आनेवाले दिन मे सुकूनवाली रहमत की बारीश बरसा दे आमीन**

मान्सूनच्या तब्बल तीन महिने कर्जतसह परिसरात अल्प पावसाने नोंद केली. यामुळे जवळपास सर्वच ठिकाणी पाण्याचे नैसर्गिक जलस्रोत कोरडेठाक पडले असून भीषण दुष्काळजन्य परिस्थिती ओढवली आहे. सजीवसृष्टी निसर्गापुढे हतबल झाली असून यासाठी शुक्रवारी मुस्लिम समाजाच्यावतीने परमेश्वरास मान्सून पावसाच्या सक्रियतेसाठी प्रार्थना करण्यात आली. यात सर्वत्र सुख-समृद्धीसह पावसाने हजेरी लावावी असे साकडे घालण्यात आले.



**कर्जत :** सध्या मान्सून पावसाने सगळीकडेच ओढ दिल्याने सजीवसृष्टी निसर्गापुढे हतबल झाली. सर्वसामान्य शेतकरी, नागरिक यासह पशुधन यांचा प्रश्न गंभीर बनला असून चिंतातुर वातावरण निर्माण झाले. याच पार्श्वभूमीवर शुक्रवारी कर्जत मुस्लिम समाजाने मान्सून पावसाच्या सक्रियतेसाठी विशेष नमाज (नमाज-ए-इस्तीस्का) अदा केली. भारत देशासह महाराष्ट्रात तसेच कर्जतच्या परिसरात भरपूर आणि समाधानकारक पाऊस पडावा असे परमेश्वरास हाफिज तलहा यांनी साकडे घालत दुवा केली.

कर्जत शहरासह परिसरात यंदा मान्सून पावसाने चांगलीच ओढ दिली. एक-दोन अपवाद जोरदार पाऊस झाला असून मान्सून पावसाचे तब्बल तीन महिने कोरडेठाकच गेले. पावसाने ओढ दिल्याने सर्वसामान्य शेतकरी, नागरिक यासह पशुपालक आणि जनावरांपुढे शेतीसह पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न पडला आहे. सजीवसृष्टी समोर चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या निसर्गाच्या हतबलते पुढे कर्जत मुस्लिम समाजाने शुक्रवारी जुम्माची नमाज अदा केल्यानंतर पठाण मळा येथे मान्सून पावसासाठी हाफिज तलहा (अंबडकर) यांच्या मार्गदर्शनाखाली भर कडक उन्हात विशेष नमाज (नमाज-ए-इस्तीस्का) पार पाडली. नमाज पार पाडल्यानंतर हाफिज तलहा यांनी मान्सून सक्रियतेसाठी परमेश्वराकडे प्रार्थना करीत आगामी काळात भरपूर आणि समाधानकारक पाऊस भारतात सर्वत्र पडावा असे साकडे घातले. सर्वसामान्य शेतकरी, पशुपालक यासह शेत-शिवार यांना दिलासा मिळावा. निसर्ग पुन्हा हिरवळीने नटत जमीन सुख-समृद्धीने बहरावी अशी प्रार्थना करीत टंचाईसदृश्य परिस्थिती निवळत मान्सून सक्रिय व्हावा अशी साद परमेश्वरास घातली. यावेळी मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव उपस्थित होते.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

शनिवार दि.१२ सप्टेंबर २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

# देव दर्शनाला निघालेले दोन युवक अपघातात ठार

## नगर - मनमाड रस्त्याचा आणखी बळी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी शहरातील नगर-मनमाड महामार्गावर हॉटेल रुबाबसमोर गुरुवारी (दि. १० सप्टेंबर) मध्यरात्री साडेबारा ते एक वाजण्याच्या सुमारास दोन दुचाकींची समोरासमोर जोरदार धडक होऊन भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत दोन युवकांचा मृत्यू झाला असून एक महिला जखमी झाल्याची माहिती समजली आहे. या घटनेतील मिळालेल्या माहितीनुसार, शुभम तनपुरे व अनिकेत तनपुरे हे हॉटेलमध्ये जेवण करून दुचाकी क्रमांक एमएच १७ डीके ४४११ वरून घरी जात होते. त्याचवेळी अकोले येथील ऋषिकेश बाळासाहेब गिऱ्हे (वय १९) हे एका महिलेसोबत दुचाकी क्रमांक एमएच १७ सीडब्ल्यू ६८११ वरून नगरच्या दिशेने श्री क्षेत्र मढी येथे देवदर्शनासाठी जात होते.



हॉटेल रुबाबसमोर दोन्ही दुचाकींची समोरासमोर जोरदार धडक झाली. धडक एवढी भीषण होती की ऋषिकेश बाळासाहेब गिऱ्हे यांचा जागीच मृत्यू झाला. तर गंभीर जखमी झालेल्या अनिकेत तनपुरे यांना उपचारासाठी अहिल्यानगर येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला. शुभम तनपुरे यांच्यावर राहुरी येथील लाईफ इन हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत.

अपघातातील महिला जखमी असल्याची माहिती आहे. अनिकेतच्या निधनाने सर्वत्र एकच हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. या अपघातात मृत्यू झालेला अनिकेत तनपुरे हा कष्टाळू, जिद्दी आणि मनमिळावू स्वभावाचा युवक होता. तो राहुरी शहरातील केंब्रिज कपड्यांच्या शोरूममध्ये कामाला होता.

अल्पावधीतच आपल्या स्वभावाने मित्रपरिवार आणि परिचितांमध्ये त्याने आपले स्थान निर्माण केले होते.अनिकेतच्या अचानक झालेल्या निधनाने त्याच्या मित्रपरिवार, नातेवाईक आणि परिचितांवर मोठा आघात झाला असून राहुरी शहरात हळहळ व्यक्त होत आहे. अपघाताची माहिती मिळताच अनिकेत चे नातेवाईक व मित्र परिवारांनी घटनास्थळी धाव घेतली. या दुर्घटनेमुळे नगर-मनमाड महामार्गावर काही काळ वाहतुकीची कोंडी झाली होती. घटनेचा पुढील तपास राहुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार तुळशीदास गिते व पोलीस हेड कॉन्स्टेबल संदीप ठाणगे करीत आहेत.

# ‘गोरक्षक’ नव्हे, ‘गोभक्षक’

## शेतकऱ्यांना देशोधडीला लावणाऱ्या टोळ्यांवर मकोका लावा



### रयत क्रांती संघटनेचे सागर खोत यांचा गंभीर आरोप

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** : गो-रक्षणाच्या नावाखाली शेतकरी आणि पशुपालकांना मारहाण, दमदाटी करून त्यांची जनावरे पकडणाऱ्या कथित टोळ्यांवर कठोर कारवाई करून संघटित स्वरूपाचे गुन्हे सिद्ध झाल्यास मकोका लावावा, अशी मागणी रयत क्रांती संघटनेचे सागर सदाभाऊ खोत यांनी केली आहे. दारूच्या नशेत शेतकऱ्यांना मारहाण करणारे गोरक्षक नसून गोभक्षक आहेत. त्यांच्या कारवायांमुळे दूध व्यवसाय करणारा शेतकरी देशोधडीला लागत आहे, असा गंभीर आरोप त्यांनी केला. यावेळी बोलताना सागर खोत म्हणाले की,शेतकऱ्यांची जनावरे पकडल्यानंतर ती परत मिळविण्यासाठी न्यायालयीन प्रक्रिया करावी लागते. निकालासाठी सुमारे तीन महिने जातात. त्यानंतर शेतकरी जनावरे घेण्यासाठी गोशाळेत गेल्यास दररोज एक हजार रुपये प्रमाणे सांभाळ खर्च मागितला जात असल्याचा आरोप खोत यांनी केला. त्यामुळे ३० हजार रुपये किमतीच्या गाईसाठी तीन महिन्यांचा सांभाळ खर्च तब्बल ९० हजार रुपये होतो. एवढा खर्च परवडत नसल्याने अनेक शेतकरी जनावरे परत घेण्यासाठी पुढेच येत नसल्याचा दावा त्यांनी केला. मारहाण प्रकरणातील आरोपी पोलिसांच्या हाती का लागले नाहीत, असा सवाल आंदोलनकर्त्यांनी उपस्थित केला होता. याबाबत पोलिसांनी सक्षमपणे उत्तर देऊन आरोपींच्या शोधाबाबत भूमिका स्पष्ट केल्यानंतर आंदोलकांनी ठिय्या आंदोलनातून माघार घेतली. दरम्यान, मारहाण झालेल्या व्यक्तीच्या नातेवाईकांकडून आक्रोश सुरू असून संबंधित कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी रयत क्रांती संघटना कार्यरत राहणार असल्याचे सागर सदाभाऊ खोत यांनी स्पष्ट केले. गो-रक्षणाच्या नावाखाली कायदा हातात घेणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, मारहाण व कथित लूटप्रकरणांची निष्पक्ष चौकशी करावी आणि शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी रयत क्रांती संघटनेने केली आहे.

### गोशाळा चालक-गोरक्षकांची साखळी!

जनावरे पकडण्यापासून ते गोशाळेत ठेवण्यापर्यंतच्या प्रक्रियेत कथित गोरक्षक आणि काही गोशाळा चालक यांच्यात मोठी साखळी असल्याचा गंभीर आरोप सागर खोत यांनी केला. शेतकरी जनावरे परत घेण्यासाठी येत नसल्याचा फायदा घेत गोशाळेतील जनावरांची विक्री केली जात असल्याचा आरोप करून या संपूर्ण प्रकाराची स्वतंत्र व सखोल चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली.

# भरधाव ट्रकची दुचाकीला धडक

## तीन मित्रांचा जागीच मृत्यू

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आष्टी** : बीड ते अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील उकंडा फाट्याजवळ भरधाव ट्रकने दुचाकीला दिलेल्या भीषण धडकेत तिघा मित्रांचा जागीच मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना गुरुवारी रात्री साडेअकराच्या सुमारास घडली. कैलास टूले, अक्षय शिंदे आणि ऋषिकेश फुलझळके अशी मृतांची नावे आहेत. तिघेही दुचाकीवरून आपल्या गावाकडे परतत असताना हा अपघात झाला. गेल्या दोन वर्षांपासून बीड-अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरू आहे.

काम सुरू असलेल्या ठिकाणी वाहनचालकांच्या सुरक्षिततेसाठी पुरेसे सूचनाफलक, बॅरिकेटिंग आणि इतर आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत का, असा गंभीर प्रश्न या दुर्घटनेनंतर उपस्थित झाला आहे.



स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, रस्त्याचे काम सुरू असताना वाहनचालकांना आवश्यक पूर्वसूचना न मिळाल्यास अशा दुर्घटनांचा धोका वाढतो. दरम्यान, गुरुवारी महाराष्ट्रातील विविध भागांत झालेल्या अपघातांमध्ये मोठी जीवितहानी झाल्याची पार्श्वभूमी असतानाच बीडमधील या दुर्घटनेने हळहळ व्यक्त होत आहे.

# बेपत्ता ग्रामसेवकाचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत आढळला



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**बीड** : गेवराई तालुक्यात धक्कादायक घटना घडली आहे. रेवकी-देवकी व बागपिंपळगाव ग्रामपंचायतीचा पदभार सांभाळणारे ग्रामसेवक तुकाराम भागवत घोलप हे गेल्या पाच-सहा दिवसांपासून बेपत्ता होते. अशातच बीड शहरालगतच्या सह्याद्री देवराई परिसरात आज त्यांचा कुजलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आला आहे. दुपारी सुमारे दोन वाजण्याच्या सुमारास मृतदेह आढळला आहे, या घटनेमुळं बीड जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. ग्रामसेवक तुकाराम घोलप हे काही दिवसांपासून बेपत्ता असल्याने त्यांच्या कुटुंबीयांसह संबंधितां कडून त्यांचा शोध घेतला जात होता. शनिवारी सह्याद्री देवराई परिसरात नागरिकांच्या निदर्शनास एक मृतदेह आल्यानंतर ही घटना समोर आली आहे. या मृतदेहाची ओळख तुकाराम घोलप यांची असल्याचे सांगण्यात येत आहे. घोलप यांच्या मृत्यूमुळे त्यांच्या कुटुंबीयांसह ग्रामस्थ आणि ग्रामपंचायत विभागात शोककळा पसरली आहे. दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, ग्रामसेवक तुकाराम घोलप यांच्या मृत्यूमागील नेमके कारण काय, याचा उलगडा अद्याप झालेला नाही. पोलिसांच्या तपासानंतरच मृत्यूचं कारण समोर येणार आहे. या घटनेची माहिती मिळताच बीड ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून मृतदेह ताब्यात घेतला आहे. पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू केली आहे. या घटनेचा अधिक तपास पोलिसांकडून केला जात आहे.

# अहिल्यानगर एमआयडीसीमध्ये एफडीएची कारवाई

## ४ कोटींचे बटर जप्त




**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाने राज्यभर विशेष तपासणी मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेअंतर्गत अहिल्यानगरमध्ये मोठी कारवाई करण्यात आली आहे. अहिल्यानगरच्या निंबळक परिसरातील एफडीएची भागातील अरिहंत कोल्ड स्टोरेजवर एफडीएच्या पथकाने रात्री उशिरा धाड टाकली. या कारवाईत तब्बल ७५ हजार ३५६ किलो पाश्चराइज्ड कुकिंग बटरचा साठा जप्त करण्यात आला आहे. या साठ्याची बाजारातील किंमत तब्बल ३ कोटी ९५ लाख ६२ हजार रुपये इतकी आहे. ‘मधुरामा क्रीमी डिलाईट’ या ब्रँडच्या बटरच्या दर्जा आणि लेबलिंगबाबत संशय आल्याने ही कारवाई करण्यात आली. पथकाने विविध बॅचमधील चार नमुने तपासणीसाठी घेतले असून ते प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत. संपूर्ण साठा सुरक्षितपणे जप्त करून प्रशासनाच्या ताब्यात ठेवण्यात आला आहे. प्रयोगशाळेच्या अहवालात भेसळ, निकृष्ट दर्जा किंवा अन्न सुरक्षा मानकांचे उल्लंघन आढळल्यास संबंधितांविरोधात अन्न सुरक्षा कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली राज्यभरात भेसळखोरांविरोधात धडक मोहीम सुरू असून नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्यांवर मोक्का अंतर्गत कारवाईचे आदेशही देण्यात आले आहेत.

# कोल्हार येथे तीन वाहनांचा विचित्र अपघात

## काळे कुटुंबीय बालंबाल बचावले

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**कोल्हार** : कोल्हार-संगमनेर मार्गावरील काळा मळा (खर्डे वस्ती) येथे शुक्रवारी दुपारी तीनच्या सुमारास तीन वाहनांचा विचित्र अपघात झाला. या अपघातात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र दूध वाहतूक करणाऱ्या टँकरसह वॅगनार कारचे मोठे नुकसान झाले. कोल्हारहून संगमनेरकडे जाणाऱ्या वॅगनार कारला (एमएच ०२-पीए ९९७८) संगमनेरकडून कोल्हारच्या दिशेने येणाऱ्या दूध टँकरने (एमएच १७-एजी ५१५८) समोरून जोरदार धडक दिली. या धडकेने वॅगनार कार फिरून मागून येणाऱ्या २४ बीएच-७३७६ एच या कारवर आदळली. दरम्यान, टँकर रस्त्यालगत असलेल्या खर्डे यांच्या निवासस्थानाच्या कंपाउंडवर जाऊन धडकला. अपघातग्रस्त वॅगनारमध्ये संगमनेर येथील काळे कुटुंबातील महिला, पुरुष आणि दोन लहान मुले होती. हे कुटुंब मढी येथील दर्शन घेऊन संगमनेरला परतत होते. कोल्हार येथील भगवती मातेचे दर्शन घेण्याचे त्यांनी ठरवले होते. मात्र वेळेअभावी दर्शन न घेता पुढे जात असतानाच हा अपघात झाला. सुदैवाने सर्वजण किरकोळ खरचटण्याच्या दुखापतीवर बचावले. ‘कानिफनाथ व भगवती मातेच्या कृपेमुळेच वाचलो,’ अशी भावना काळे कुटुंबीयांनी व्यक्त केली. अपघातानंतर त्यांनी भगवती मातेचे दर्शन घेऊन संगमनेरकडे प्रस्थान केले.

# गुणोरेचे सरपंच सुरेश ढवळे यांच्यावर अविश्वास ठराव पारित

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**निघोज** : पारनेर तालुक्यातील गुणोरे ग्रामपंचायतीचे लोकनियुक्त सरपंच सुरेश ढवळे यांच्या विरोधात सर्व सदस्यांनी हजेरी लावत सह्या करीत अविश्वास ठराव दाखल केला. तहसीलदार गायत्री सौंदाणे यांच्या उपस्थितीत आयोजित विशेष ग्रामसभेत हा ठराव पारित करण्यात आला.

गुणोरे तालुका पारनेर येथील लोकनियुक्त सरपंच सुरेश ढवळे यांच्यावर सर्व ग्रामपंचायत सदस्यांनी मनमानी कारभार, दडपशाही करत पदाचा गैरवापर होत असल्याचाव त्यामुळे गावाचा विकास ठप्प झाला असल्याचा आरोप करत गेल्या चार तारखेला पारनेर येथे तहसीलदार यांच्या कार्यालयात समक्ष जात अविश्वास ठराव दाखल केला. तो मंजूर करण्याची मागणी तहसीलदार गायत्री सौंदाणे यांच्याकडे केली होती.

त्या अनुषंगाने तहसीलदार यांनी सर्व सदस्यांना दि. ११ रोजी सकाळी याबाबत विशेष सभेचे आयोजन करण्यात आल्याच्या नोटिसा बजावल्या. त्यानुसार शुक्रवार दि ११ रोजी सकाळी ११ वाजता गुणोरे ग्रामपंचायत कार्यालयात तहसीलदार गायत्री सौदाणे यांच्या उपस्थितीत विशेष सभेचे आयोजन करण्यात आले. यावेळी पुन्हा सर्व सदस्यांनी हजेरी लावत लोकनियुक्त सरपंच सुरेश ढवळे यांच्याविरुद्ध अविश्वास ठराव पारित करण्यासाठी सह्या केल्या व सर्व सदस्य ढवळे यांच्या विरोधात गेल्याने ठराव पारित करण्यात आला.

त्यानुसार तसा अहवाल तयार करून तो पुढील कार्यवाहीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यात येणार असल्याची माहिती ग्रामसेवक दरेकर यांनी दिली.

### माझ्याविरोधात षडयंत्र : सरपंच सुरेश ढवळे

मी अनुसूचित समाजाचा आहे. गावचा विकास ही चांगल्या प्रकारे करत असल्यामुळे गावातील काही जेष्ठ पुढाऱ्यांना हे देखवत नसून त्यांनीचं हे अविश्वास ठरावाचे षडयंत्र माझ्या विरुद्ध रचले आहे. तरी मी जनतेतून लोकनियुक्त सरपंच म्हणून निवडून आलो आहे. गावातील जनतेचा माझ्यावर विश्वास आहे. चांगलं चाललेले गाव पुढाऱ्याना हे देखवत नाही. तरी याबाबत आपण जिल्हाधिकारी कार्यालयाकडे दाद मागणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# चापडगावचे साहेबरावजी नेमाने पाटील विकासाभिमुख नेतृत्व हरपले

शेवगाव तालुक्यातील चापडगाव येथील माजी सरपंच साहेबरावजी भुजंगराव नेमाने पाटील यांचे नुकतेच वयाच्या ९३ व्या वर्षी वयोवृद्धामुळे निधन झाले असुन त्यांनी गावचे सरपंच पद भूषवित असताना गावात माझा कुणीच विरोधक नाही ही भावना मनात ठेऊन गावासाठी विकास कामांची गंगा आणून असंख्य विकास कामे प्रत्यक्षात करून दाखवलेली आहे.

त्यांच्या जाण्याने त्यांच्या स्वप्नातील जी गावात विकासात्मक कामे अपुरे राहिले आहेत.ती पूर्ण करण्यासाठी त्यांनी त्यांच्या राजकीय काळात जे राजकारणात हाडामासाची कार्यकर्ते तयार करून ठेवलेले आहेत.

त्यांच्या माध्यमातून निश्चित पूर्ण होतील असा असंख्य ग्रामस्थांना पूर्ण विश्वास असून त्यांचे २ चिरंजीव गेली अनेक वर्षापासून राजकारणात सक्रिय असून त्यामध्ये कल्याणराव नेमाने पाटील हे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे गेली अनेक वर्षापासून शेवगाव तालुका प्रमुख म्हणून काम पाहत असून दुसरे शिवाजीराव नेमाने हे माजी जिल्हा परिषद सदस्य असून हे दोघेही बंधू राजकारणात पाऊल टाकल्यापासून आजपर्यंत एकनिष्ठेने माजी आमदार नरेंद्र घुले पाटील व चंद्रशेखर घुले पाटील यांचे ते कट्टर समर्थक म्हणून तालुक्यात परिचित असल्याने त्यांच्या भविष्यातील राजकीय वाटचालीतून व त्यांचा गावातील सर्वपक्षीय कार्यकर्त्यांशी असलेला घनिष्ठ सबंध गावच्या विकास कामात भर टाकणारा ठरणारा असेल यात तिळ मात्र शंका नाही या मध्ये एवढे मात्र निश्चित आहे की,



साहेबराजी नेमाने पाटील यांनी स्व. लोकनेते मारुतरावजी घुले पाटील यांच्या समवेत राहून जी राजकीय आडाखे व डाव प्राप्त करून घेतलेले आहेत तेच डाव व आडाखे स्व नेमाने यांच्यानंतर दोघेही नेमाने बंधू अंगीकारातील व भविष्यातील गावच्या विकासाच्या राजकारणावर भर देण्यात यशस्वी ठरतील आणि आपल्या वडिलांनी जो गावात राजकीय ठसा सर्वपक्षीयांना सोबत घेऊन शेवटपर्यंत टिकवला आहे तोच ठसा निश्चितपणे टिकून ठेवतील यात शंका नाही असे दिसून येत आहे.

|| भावपूर्ण श्रद्धांजली ||

आमच्या गावचे माजी सरपंच मार्गदर्शक



कै.साहेबरावजी भुजंगराव नेमाने पाटील

यांचे नुकतेच निधन झाले असुन त्यांचे पवित्र पावन स्मृतीस कोटी कोटी प्रणाम

भावपूर्ण श्रद्धांजली...

शोकाकुल

भास्कर बापू वाल्हेकर
चेअरमन

श्रीराम रावसाहेब पातकळ
व्हा.चेअरमन

संस्थेचे सर्व सभासद व कर्मचारी वृंद हितचिंतक आणि ग्रामस्थ बांधव

चापडगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी

चापडगाव, ता.शेवगाव, जि.अहिल्यानगर

|| भावपूर्ण श्रद्धांजली ||

आमच्या गावचे माजी सरपंच मार्गदर्शक



कै.साहेबरावजी भुजंगराव नेमाने पाटील

यांचे नुकतेच निधन झाले असुन त्यांचे पवित्र पावन स्मृतीस कोटी कोटी प्रणाम

भावपूर्ण श्रद्धांजली...

शोकाकुल

प्रशासक, ग्रामविकास अधिकारी व सर्व ग्रामस्थ बांधव

चापडगाव ग्रामपंचायत कार्यालय चापडगाव

ता.शेवगाव, जि.अहिल्यानगर